

कृपापदावली

भाग : १

।। श्री ।।

* कृपापदावली *

भाग : १

(भजन, चिंतन, मनन यांसाठी निवडक अभंग, पदे , नव्या आरत्या,
नव्या नमनमाला, नवे नित्यपाठ, श्लोक, प्रार्थना इत्यादी)

❐

डॉ. सुहास पेठे
एम्.ए.,पीएच्.डी.(तत्त्वज्ञान)

* कृपापदावली : भाग १

पुस्तकरूपाने प्रकाशित शेवटची आवृत्ती : ऑक्टोबर २०१२
डिजिटल आवृत्ती : डिसेंबर २०२१

© डॉ. सुहास पेठे , सातारा, महाराष्ट्र

डॉ. सुहास पेठे यांच्या अन्य साहित्यासाठी पहा :
वेबसाईट : www.pethekaka.com
युट्यूब चॅनेल : Shri Pethe Kaka
अँड्रॉईड ॲप : SadhanNandadeep (साधननंदादीप)

*

हा ईश्वरी कृपाप्रसाद
सकल संतचरणी
आणि
साधकांच्या चरणी
कृतज्ञतापूर्वक समर्पण ...

- सुहास पेठे

पार्श्वभूमी

श्रींच्या कृपेने साकारलेल्या 'पदावली' ची ही स्वतंत्र आवृत्ती साधकांच्या सेवेत सादर करताना आनंद होतो. 'साधनपदावली'च्या सातव्या आवृत्तीनंतर मध्यंतरी 'साधनसांगाती' या नावाने संतछायेतील समग्र उपासना विस्तृत स्वरूपात उपलब्ध झाली होती. ती आता येथील नित्योपासनेपुरती राहणार असल्याने व त्याची सुधारित आवृत्ती, त्यात सातत्याने पडत असलेली भर लक्षात घेता, सतत प्रसिद्ध करणे अवघड आहे. त्यामुळे ती भर शक्यतो येथील आवृत्तीत हाती घालण्यात येत आहे. मात्र परगावच्या तसेच येथीलही साधकांच्या घरच्या उपासनेसाठी 'साधनपदावली' व 'कृपापदावली' यांची वाढती गरज लक्षात घेऊन आता 'साधनपदावली'ची आठवी आवृत्ती पहिला भाग म्हणून प्रसिद्ध होत आहे. तसेच 'कृपापदावली'चाही आता खूप विस्तार झाल्यामुळे 'कृपापदावली'चा पहिला भाग प्रसिद्ध होत आहे. या दोनही पदावलींचे पुढील भाग अनुकूलतेनुसार प्रसिद्ध होत आहेत.

पदांच्या निवडीमागील विचार पूर्वीप्रमाणेच ठेवण्यात आला असून कोणता विशिष्ट संप्रदाय, कर्ता, मत अशा गोष्टींना प्राधान्य दिले जात नसून भाव, भक्ती, विचार, करुणा, तळमळ, मार्ग, सावधानता इत्यादी गोष्टी प्रधान धरल्या आहेत. त्यामुळे सर्व पंथांतील किंवा वेळी कुठल्या पंथाशी बांधील नसलेल्या पण जिज्ञासू व्यक्तींनाही या दोन्ही पदावलींचा व त्यांतील प्रार्थना, अभंग, पदे, आरत्या, श्लोक, नवनव्या उपासनामाला, नवे नित्यपाठ – यांचा यापुढेही पूर्वीप्रमाणेच उपयोग होईल, अशी आशा आहे.

त्यामुळे साधनेचा मार्ग, विचार स्पष्ट होईल, प्रपंचात व परमार्थातही अत्यंत गरजेची असलेली सावधानता बाळगता येईल, खाचखळगे कळून येतील, टाळता येतील, दिशाभूल वाचेल, अवडंबर –कर्मठपणा कमी होईल, आपापला पंथ– साधन– गुरू–नाम यांच्याविषयी भाव वाढेल पण त्यांतली आग्रही भूमिका कमी होईल, इतर साधने – संप्रदाय यांविषयी आदरभाव निर्माण होईल, तसेच स्वतःच्या गुरूंविषयी,

उपास्याविषयी भाव स्वच्छ, निश्चित व शुद्ध होईल, अशी पदे घेण्याचा प्रयत्न केला आहे. तो साधकांना उपयोगी ठरावा, ही इच्छा.

यापूर्वीच्या आवृत्त्यांमध्ये तसेच साधनसांगातीमध्येही फक्त मूळ पदे, पदकर्ते व अनुक्रमणिका एवढ्याचाच समावेश केला होता.परंतु त्यानंतर त्या पदांच्या येथे म्हणण्यात असलेल्या चाली जिज्ञासूंपर्यंत पोचाव्या यासाठी, २००२ मध्ये प्रथम साधनपदावलीच्या अकरा कॅसेट्स् व कृपापदावलीच्या पाच कॅसेट्स् आणि नंतर सीडीज्, पुढे डीव्हीडीज्काळानुसार प्रसिद्ध करण्यात आल्या. त्यावेळी या पदांना पदभूमिकाही देण्यात आल्या होत्या. त्या भूमिका संक्षिप्त असल्या तरी, पदांचा अभ्यास करण्यासाठी त्यांचा साधकांना अतिशय उपयोग होत असतो, म्हणून पदावलीची पुढील आवृत्ती प्रसिद्ध करताना या भूमिकांचा समावेश या पदांबरोबर करण्यात यावा अशी अनेकांची सूचना होती. ते या आवृत्तीपासून शक्य होत आहे, याचाही आनंद होतो. त्याचबरोबर आवश्यकतेनुसार कठीण शब्दांचा अर्थही त्या त्या ठिकाणी देण्याचा प्रयत्न केला आहे .

पदावलीच्या या निरंतर प्रकल्पाला अनेकांचा हातभार लागत आला आहे. मूळ सोळा कॅसेट्स्चे रेकॉर्डिंग अत्यंत आपुलकीने व सेवाभावाने करणाऱ्या सौ. राधिका हंगेकर, श्री. हंगेकरसाहेब व त्यांचे चिरंजीव यांना तसेच, घरी पुढील रेकॉर्डिंग, एडिटिंग तसेच या भागांचे प्रकाशन, वितरण यांना हातभार लावणाऱ्या सर्व लहानथोर साधकमंडळींना धन्यवाद द्यावे, तेवढे थोडेच आहेत.

या दोन्ही पदावलींतील पदांना अनुकूल अशा चाली सुचणे ही केवळ संतकृपाच होय. त्यांचे गायन, हार्मोनियम साथ करण्यासाठी प्रतिकूल शारीरिक अवस्थेत इतकी वर्षे मला मिळालेली प्रकृतीची अनुकूलता तसेच पत्नी सौ. सुखदा हिचे प्रोत्साहन व सहकार्य हाही याच कृपेचा भाग होय. तसेच इतकी वर्षे जवळपास अडीचशे पदांना तबल्याची समजूतदार साथ रा.रा. नंदन तर, झांजेची साथ श्री. मंगेश मंत्री करीत आले आहेत. हा ईश्वरी प्रसाद प्रेमळ साधकांपर्यंत पोचवण्यात त्यांचा असलेला सहभाग व सेवाभाव यांची मी ऋणज्ञतेने नोंद घेतो.

ही आवृत्ती प्रसिद्ध करण्यापूर्वी नुकतीच २१२ ट्रॅक्सची ऑडिओडीव्हीडी

क्र.७ प्रकाशित झाली आहे. ती ती पदे त्यातून ऐकण्यास सुलभ जावी म्हणून, पदाच्या शेवटी त्या त्या पदाचा ट्रॅक नंबर दिला आहे. अधिक सोयीसाठी श्रींच्या कृपेने साधनपदावलीची व कृपापदावलीची ऑडिओ सीडी पदावलीच्या भागानुसार लवकरच उपलब्ध करण्याचा विचार आहे. येथील पदांची मांडणी डीव्हीडी क्र.७ मधील क्रमाने केली असून विशिष्ट पद चटकन मिळावे म्हणून अनुक्रमणिका मात्र अकारविल्हे देण्यात आली आहे.

या दोन्ही पदावलींतील पदांच्या निरंतर अभ्यासाने, अर्थाच्या मनन चिंतनाने, ती पदे अर्थ लक्षात घेऊन मनापासून म्हणण्याने – आपले अंतरंग शांत होवो, उजळून निघो, ते परमार्थाला उत्तरोत्तर अधिक अनुकूल होवो – अशी श्री गोंदवलेकर महाराजांना व सर्व संतसत्पुरुषांना प्रार्थना करून, या पदावलींची सेवा त्यांच्या चरणी अर्पण करीत आहे.

संतछाया,
सातारा. **- सुहास पेठे**

*

कृपापदावली भाग : १

अनुक्रम

विभाग : १ – कृपापदे

येथे समाविष्ट केलेल्या सर्व पदे व अभंगांची
वर्णानुक्रमणिका

अनुक्रमांक	पदाची सुरुवात	पृष्ठ क्रमांक
१.	अजब ही परमार्थाची तऱ्हा	..२३..
२.	कधि न उपाशी, कधि न तुपाशी	..५१..
३.	काही करुनि आता देवा	..४५..
४.	कितीक आमुची कामे अडली	..३३..
५.	जागे होता दुःख न उरते	..२७..
६.	जागृत आपण हृदयी असता	..२९..
७.	तुझी मज लागलीसे आस	..४१..
८.	नाम घेणार, गाथा वाचणार	..४९..
९.	पुरे जगातिल वणवण आता	..१९..
१०.	पूजा देवा कैची	..१७..
११.	फुटके माझे तारू	..२५..
१२.	भावे जोडोनिया हात	..४३..
१३.	मजपाशी नाही काही	..१३..
१४.	मार्गी सांभाळा आम्हासी	..१५..
१५.	माझी माय दयासिंधू	..३५..

अनुक्रमांक	पदाची सुरुवात	पृष्ठ क्रमांक
१६.	माझे प्रपंची या गुरुराया	..४७..
१७.	रहस्य जे जाणती	..३१..
१८.	व्हावे तरी काम	..२१..
१९.	सांभाळ किती करणार, अमुचा	..३९..
२०.	साद घालितो सत्संगा	..३७..

विभाग : २ – आरत्या

		पृष्ठ क्रमांक
१.	देवांची आरती	..५३..
२.	श्रीरामाची आरती	..५५..
३.	विश्वात्मकाची आरती	..५७..
४.	गुरुपदाची आरती	..५९..
५.	श्री दत्तप्रभूंची आरती	..६१..
६.	श्री पांडुरंगाची आरती	..६३..
७.	श्रीकृष्णाची आरती	..६५..
८.	श्री मारुतीची आरती	..६७..
९.	श्री गणपतीची आरती	..६९..

विभाग : ३ – प्रार्थना

पृष्ठ क्रमांक

खऱ्या किमान उपासनेसाठी प्रार्थना ..७०..

विभाग : ४ –उपासनामाला

१. संतनमनमाला ..७१..
२. नामनिवेदनमाला ..८४..

विभाग : ५ – नित्यपाठ

१. एकाध्यायी विचारगीता ..८५..
२. गुरुतत्त्वतरंगिणी ..८९..

विभाग : ६ – नव्या चिंतनिका

१. साधुलक्षण चिंतनिका ..९७..
२. श्री ज्ञानेश्वरी : अध्याय नववा
संक्षिप्त आदेश चिंतनिका ..९८..

विभाग : ७ – नवे मराठी मंत्र

		पृष्ठ क्रमांक
१.	ईशसाधन अग्निमंत्र	..९९..

विभाग : ८ – नवे सममंत्र

१.	ईशावास्य सममंत्र	..१०१..

विभाग : ९ – नवे श्लोक

१.	अर्थ कळो	..१०४..
२.	सकाळची प्रार्थना	..१०४..
३.	सद्गुरुवंदन	..१०५..
४.	शुद्ध ध्येय	..१०५..
५.	शरणागती	..१०६..
६.	खरा आधार	..१०६..
७.	कृतिकौशल्य	..१०७..
८.	वृष्ट – मंत्र	..१०७..
९.	सृष्टीतील स्वधर्म	..१०८..
१०.	मानवी स्वधर्म	..१०८..
११.	संचिताच्या भेटी	..१०९..
१२.	कर्मस्वातंत्र्याचे चीज	..१०९..

* १. कृपापदे *

भूमिका

या पदमालिकेत सादर होणारी पदं म्हणजे श्री सद्गुरू गोंदवलेकर महाराज आणि सर्व संत सत्पुरुषांची व्यक्त झालेली कृपाच होय. या अर्थानं ती कृपापदं आहेत. ती पदं लिहिताना कविता नाहीत किंवा म्हणताना गाणं नाहीत. तर भगवंताकडच्या साधनप्रवासातली ती पदं म्हणजे पावलं आहेत. त्या अर्थानं ती साधनपदंही आहेत. या प्रवासातल्या विविध अवस्था आणि अनुभव त्यातून व्यक्त होतात. त्यामुळंच ही पदं रचताना किंवा गाताना काव्यशास्त्रापेक्षा भावाला, अनुभवाला आणि साधकवृत्तीला पूर्ण प्राधान्य देणारी आहेत. म्हणून ही कृपापदं साधकवृत्तीनं पहावीत, ऐकावीत आणि वापरावीत, अशी विनयपूर्ण प्रार्थना आहे. अन्य पदं कृपापदावलीच्या पुढील भागांतून दिली जात आहेत.

भगवंताच्या प्राप्तीसाठी किती प्रकारचे भक्त धडपडत असतात. त्यात मोठमोठे ज्ञानी, कर्मयोगी, लौकिकानं मानमान्यतेनं थोर असलेले असे नाना तऱ्हेचे भक्त आढळतात. यातही पुन्हा भक्तसुद्धा किती प्रकारची साधनं करीत असतात. जप आहे, तप आहे, अनुष्ठानं, सेवा, सत्कर्मं, उपासना, कायाक्लेश, व्रतवैकल्यं, दानधर्म – एक ना दोन – नाना साधनं, हे भक्त करतात. हे सारं पाहिलं की वाटतं, सामान्य भक्ताचं काय, त्याच्याजवळ ना लौकिक, ना मान, ना त्याच्याजवळ सत्कर्मं, दानधर्म अशा सामान्य भक्ताचं भगवंताच्या प्राप्तीसाठी तळमळणारं हृदय या पदात व्यक्त झालं आहे. इतर मोठमोठी साधनं नसली आणि स्वतःलाही कोणती मानमान्यता नसली तरी, भक्तीला अपरिहार्य असलेली एक गोष्ट मात्र या भक्ताकडं आहे, ती म्हणजे भगवंताबद्दलचा किंवा सद्गुरूंबद्दलचा एकनिष्ठ भाव आणि तो मात्र त्यानं मनःपूर्वक अर्पण केलेला आहे. अर्थात हा भावच, भगवंताला प्रसन्न व्हायला पुरेसा असल्याचा, ध्वनित होणारा अर्थ, हा साधकांना नक्की दिलासा देईल.

..१..

मजपाशी नाही काही
एक भाव आणिला पाही ।।धृ।।

किती एक झिजविती काया
किती एक तोडिती माया
तपपुण्ये तुज अर्पाया
किती आणिती गुरुराया ।।१।।

किती एक देती दाने
योग याग नाना साधने
किती एक सेवा करिती
किती सत्कर्मे तुज देती ।।२।।

किती एक थोर ज्ञानी
किती एक स्थिर निर्गुणी
धनमाने जगि किती थोर
तुज सर्वस्वे सादर ।।३।।

मज साधन ना ज्ञान
नसे लौकिकही नसे मान
तुजवीण दुजे मज नाही
एक भावे दीन पायी राही ।।४।।

(ट्रॅक नं. ०९९)

आयुष्यात कुठलंही ध्येय गाठायचं म्हणजे सर्व प्रकारचे अथक प्रयत्न, आत्मविश्वास, निर्धार अशा गोष्टींची गरज असते, तरच ते ध्येय गाठण्याचे प्रयत्न यशस्वी होतात, हे आपण जाणतोच. प्रापंचिक ध्येयांच्या बाबतीत खरी असलेली ही गोष्ट पारमार्थिक ध्येयांच्या बाबतीतही खरी आहे. फक्त या साऱ्याबरोबर पूर्णत्वाचं किंवा देवत्वाचं पारमार्थिक ध्येय गाठण्यासाठी ही वाटचाल परमार्थाच्या प्रांतात मात्र फक्त त्यांच्या कृपेनंच होऊ शकते. याची पदोपदी जाणीव बाळगण्याची गरज असते. कारण नुसते प्रयत्न आणि निर्धार एवढ्यानं हे ध्येय गाठत नाही. प्रयत्नांना येणाऱ्या यशाची किंवा त्यामुळं होणाऱ्या अहंकाराचीसुद्धा परमार्थात मोठीच अडचण होऊ शकते. म्हणून प्रयत्न करणारा देह, बाजूचा सारा ऐहिक व्यवहार, पारमार्थिक साधनं या साऱ्या बाबतीत त्यांच्या कृपेशिवाय पाऊल टाकणंही अवघड असल्याची नम्र जाणीव बाळगणं, त्यांनी सातत्यानं कृपापूर्वक मार्गात आपला सांभाळ करावा अशी प्रार्थना करणं आणि दुसऱ्या बाजूनं ध्येयप्राप्तीसाठीचा प्रत्येक प्रयत्न करण्याचा निर्धार ठेवणं, या दोन्हीही गोष्टींची गरज आहे. त्यासाठी ही प्रार्थना उपयोगी ठरूशकेल.

..२..

मार्गी सांभाळा आम्हांसी । तुमचे पायी ही विनंती ।।धृ।।

आम्ही जाणू तुमचा मार्ग । आम्ही चालू तुमचा मार्ग ।
राहुनि तत्पर कर्तव्यासी । आणिक अढळ तवमार्गासी।।१।।

अमुचा श्वास तुमचे हाती । निःश्वास तुमचे हाती ।
अमुचा देह तुमचे हाती । तरिही चालू तव मार्गासी ।।२।।

अमुचा प्रपंच तुमचे हाती । गणगोत तुमचे हाती ।
अमुचे क्षेम तुमचे हाती । तरिही चालू तव मार्गासी ।।३।।

अमुचे ऐहिक तुमचे हाती । पारलौकिक तुमचे हाती ।
तडीस नेणे तुमचे हाती । तरिही चालू तव मार्गासी ।।४।।

अमुचा विवेक तुमचे हाती । वैराग्य तुमचे हाती ।
अमुचे निश्चय तुमचे हाती । तरिही चालू तव मार्गासी ।।५।।

अमुचे मौन तुमचे हाती । अध्ययन तुमचे हाती ।
अमुचे भजन तुमचे हाती । तरिही चालू तव मार्गासी।।६।।

अमुचे नाम तुमचे हाती । अनुसंधान तुमचे हाती ।
अमुचे साधन तुमचे हाती । तरिही चालू तव मार्गासी ।।७।।

(ट्रॅक नं. १००)

पूजाअर्चा, तीर्थयात्रा असल्या गोष्टी वरवर पहाता किती सोप्या वाटतात. थोडं फार साहित्यगोळा केलं, अर्पण केलं, दोन–चार उपचार केले, पाच–दहा मिनिटं दिली की, पूजेसारखं साधन सहज करता येईल असं वाटतं. तसं ते आपण एरवी करतोसुद्धा. पण मुळात जे पूजेत अभिप्रेत आहे, त्या पद्धतीनं ते करायचं म्हटलं म्हणजे मात्र, या एरवी अगदी सोप्या वाटणाऱ्या विषयातसुद्धा अवघडपणा काय आहे, याची कल्पना येऊ लागते. त्याचबरोबर हेही लक्षात येतं की, अशी खरी पूजा घडली तरच ती फलदायी ठरेल. आजवर वरवरची बाह्य उपचारांची पूजा करूनही अनेकांना त्याचं कोणतंही फळ का मिळत नाही, याचाही या निमित्तानं उलगडा होतो. एकेका उपचाराचा यात केलेला विचार समोर आला तर, जरी खरी पूजा एका बाजूनं अवघड वाटायला लागली, तरीसुद्धा एकतर दुसऱ्या बाजूनं खरी पूजा तरी सुरू होईल किंवा शरणागती तरी येईल. दोन्हीही साधकाला उपयोगीच ठरतील.

..३..

पूजा देवा कैची मज घडे तुमची
करू जाता ऐशी होय दशा ।।धृ।।
करू जाता ध्यान एका ठायी मन
क्षणी जाते भान ध्यान कैचे ।।१।।
बोलाविता तुम्हा हवा भाव पायी
मन शत ठायी आवाहन कैचे ।।२।।
निर्मल हृदयाचे आपणासी आसन
हृदय मलिन कैचे देऊ ।।३।।
सद्भावांची गंगा घालावया स्नान
माझे भाव हीन स्नान कैचे ।।४।।
स्वार्थापायी माझे झिजते शरीर
चंदनाचा उपचार करू कैचा ।।५।।
सत्कर्मांची फुले नाही मजपाशी
दुष्कर्मांच्या राशी फोल होती ।।६।।
आर्त एक भाव हवा तुम्हा पायी
गुंतलो प्रपंची पाही आरती कैची ।।७।।
दीन म्हणे मज खरी पूजा सेवा
घडवावी देवा करुणाकरा ।।८।।

(ट्रॅक नं. १०२)

आनंदाचा शोध हा माणसाचा फार पुरातन आणि आजवर चाललेला शोध आहे. अत्यंत सोपा असलेला प्रश्न खूप अवघड समजून, प्रचंड कष्ट घेऊन खूप काळ सोडवावा – असा काहीसा प्रकार या आनंदाबद्दल होतो, असं आपल्या लक्षात येईल. म्हणून या पदात प्रश्न केला आहे की, मार्ग सुखाचा आतच असता, जगामध्ये का फिरा ? आजवर माणसांच्या मागे धावून झालं, वस्तूंच्या मागे धावून झालं, देवाला साकडं घालून झालं, जगापुढे पदर पसरून झाला, पण हा आनंद काही मिळाला नाही. एवढ्या अनुभवानं शहाणं होऊन, आपण आता जरा आत शोधून पाहूया, अशी प्रार्थना आनंदाच्या साधकानं या पदात तळमळीनं केली आहे. आपणच आत्मपरीक्षण केलं तर आपल्यातच असलेला आनंदाचा अक्षय झरा आपल्याला गवसू शकेल, असंही सार्थपणे इथं सुचवलेलं आहे.

..४..

पुरे जगातील वणवण आता
वळवूया मोहरा
करूया अंतर्यात्रा जरा ।।धृ।।

सृष्टी,माणुस अन् देवाते
मागायचे सतत किती ते
देहसुखाचे पात्र न भरते
सावध होऊ जरा...! ।।१।।

जेथे नाही तिथे शोधितो
वाया जीवन जगी दवडितो
मार्ग सुखाचा आतच असता
जगामधे का फिरा... ? ।।२।।

दीन म्हणे रे मनास बोधू
आत्मपरीक्षण करुनी शोधू
हृदयामधला स्वानंदाचा
अक्षय निर्मळ झरा... ! ।।३।।

(ट्रॅक नं. १०३)

सामान्य माणूस जीवनाचे प्रपंच–परमार्थ, ऐहिक–पारलौकिक अशा त-हेचे विभाग करतो. त्या विभागांना तो वेगळं ठेवतो. त्यांतल्या गोष्टीही तो वेगवेगळ्या पद्धतीनं, वेगवेगळ्या भूमिकेनं करतो. जसा तो प्रपंच तडीचा आणि परमार्थ सवडीचा मानतो. पण ज्याला खरा परमार्थ साधायचा आहे, तो जीवनाचे असे विभाग करीत नाही. तो जीवन समग्र मानतो, एकच मानतो. त्यामुळं खरा साधक त्याचा साराच व्यवहार भगवंताचा मानतो. त्याच्यावर सोपवतो, त्याच्या स्मरणात करतो. इथं असा साराच जीवनव्यवहार गुरुदत्त नामावर सोपवल्याचं आढळेल. काम प्रापंचिक असो, तीर्थ–व्रतांसारखं असो, अंतिम हिताचं किंवा कल्याणाचं असो. सारंच त्या नामावर सोडलेलं इथं आढळेल. संतप्रणीत नामाचा हा मार्ग, हाच इथं जीवनसर्वस्व आहे. काम झालं तरी नामानं, न झालं तरी नामानंच, असा नामनिष्ठेचा एक स्वानुभवाचा प्रकर्ष इथं आढळतो. ज्यातून साधकांना काही घेण्यासारखं आहे, असं वाटतं.

..५..

व्हावे तरी काम होवो तुझिया नामे ।
न व्हावे ते न होवो तुझिया नामे ।।१।।

व्हावा तरी प्रपंच होवो तुझिया नामे ।
न व्हावा तो न होवो तुझिया नामे ।।२।।

तीर्थव्रतनेम होवो तुझिया नामे ।
न व्हावे ते न होवो तुझिया नामे ।।३।।

व्हावे तरी हित होवो तुझिया नामे ।
न व्हावे ते न होवो तुझिया नामे ।।४।।

घेता नाम वाटे घडे ते सुखाचे ।
नाम सत्ते नाचे प्रारब्धही ।।५।।

प्रयत्नांचे आदीअंती तुझे नाम घेऊ ।
दीन म्हणे जाऊ संतमार्गे ।।६।।

(ट्रॅक नं. १०४)

आपल्या परमार्थ करण्यातल्या विरोधाभासाचं मोठं प्रत्ययकारी चित्रण या पदात आलेलं आहे. त्यातून, आपण परमार्थ करीत असूनसुद्धा, जे साधायला हवं ते का साधत नाही, याचाही उलगडा होऊ शकतो. आपल्या घरातली माणसं वाढली, गरजा वाढल्या की, आपण घर वाढवतो, घर बदलतो पण, त्याबरोबर भगवंताला लागणारी जागाही वाढायला हवी म्हणजे, लक्षणेनं भगवंताची गरज, त्याच्या उपासनेचं प्रमाण हेसुद्धा वाढायला हवं, हे सोईस्करपणे विसरतो. सगळ्या माणसांत देव आहे, असं मानतो, घोकतो. पण आपल्या मनाविरुद्ध वागणाऱ्या माणसातला देव आपण सोईस्करपणे विसरतो. इतकंच काय, आपल्या मनासारखा वागणारा माणूस आपल्याला खरा वाटतो, देव वाटतो. तीच गोष्ट आमच्या भक्तीची आहे. आपल्याला हे कळतं की, खरी भक्ती ही कशावरच अवलंबून नाही. तिला फक्त भाव लागतो. पण आपण जरा कुठं मोठं भव्य देऊळ, आरास, मोठमोठे यज्ञ, अनुष्ठानं, पूजा असं पाहिलं की, मनानं भुलतो, खंतावतो. एकतर, त्याबद्दल आकर्षण वाटतं किंवा परिस्थितीनं तसं करणं आपल्याला शक्य नसलं तर, ते करणाऱ्याबद्दल मनात सूक्ष्म असूया, हेवा हे घेऊनच आपण घरी येतो. एक ना दोन अनेक प्रकारांनी अजब ठरणाऱ्या आणि त्यामुळंच उपयोगाला न येणाऱ्या आपल्या परमार्थाबद्दल आपण वेळीच सावध व्हावं, हे हिताचं ठरेल.

..६..

अजब ही परमार्थाची तऱ्हा
आमुच्या परमार्थाची तऱ्हा,
अजब ही परमार्थाची तऱ्हा ।।धृ।।

अपुरे पडता घर वाढवितो ।
सुखसोयींनी सदा सजवितो ।
परि घराचा मालक वाटे, कोनाड्यात बरा ! ।।१।।

देव मानतो, जगी सांगतो ।
जनी जनार्दन, सदा घोकतो ।
मनासारखा वागे माणुस, वाटे तोच खरा ! ।।२।।

भाव पाहिजे भक्तीसाठी ।
उपचारांची न लगे दाटी ।
भव्यदिव्य पूजा कुठे पाहता, हेवा आणी घरा ! ।।३।।

आपुल्यापाशी सारे दडले ।
मर्म हुडकण्या जिणे लाभले ।
उठाठेवि करी उगा जगाच्या, दीना सावध करा ! ।।४।।

(ट्रॅक नं. १०५)

या पदामध्ये व्यक्त झालेल्या दोन गोष्टी साधनी माणसांच्या दृष्टीने अत्यंत मोलाच्या आहेत. पहिली आत्मपरीक्षण आणि दुसरी आपला उद्धार करणाऱ्या सद्‌गुरूंवरची अविचल निष्ठा. आत्मपरीक्षण ही परमार्थाची महत्त्वाची आणि पहिली पायरीच आहे. माणूस म्हणून इतक्या शक्ती, अपार क्षमता लाभूनसुद्धा आपलं कल्याण आपण साधू शकत नाही, ही वस्तुस्थिती आत्मपरीक्षणानं समोर येते, मार्ग कळतो, चालण्याचा निर्धारही होतो. पण आपला हा निर्धार अमलात आणायची आपली ताकद कमी पडते, हेही पुढं कळतं. मग एकच खात्री उरते ती, आपल्या सर्वसमर्थ दयाळू सद्‌गुरूंची. तिच्यावरचा दृढ विश्वासच या शब्दाशब्दांत व्यक्त झाला आहे.

..७..

फुटके माझे तारू, नेतिल, पैलपार सद्‌गुरु ।।धृ।।

घट पुण्याचा भरला, दुर्लभ देह जिवा लाभला
शक्तिबुद्धिने भरला, हाती चिंतामणि आला
दुर्भाग्ये परि मजला नकळे देहे काय करू ? ।।१।।

लोभ किती मी करितो, हेवा सतत कुणाचा करितो
अखंड चंचल बनतो, क्षोभे दुःख जगाला देतो
टिकण्यासाठी धडपड माझी, विनाश करिते सुरू ! ।।२।।

नवद्वारांनी शिरते पाणी, नच आवरिता येते
किती जरी कष्टलो, मनाला आवरणे ना जमते
दया येउनी गुरू कृपाघन येइ मला सावरू !।।३।।

संसारी हे व्यर्थ कष्टणे बोध मना झाला
ध्येय कळे, परि पैल गाठणे कठीण हे मजला
दीन म्हणे परि कुशल सद्‌गुरु, तोच भरवसा धरू ! ।।४।।

(ट्रॅक नं. १०७)

आपल्याभोवती घडणाऱ्या विविध घटनांनी सतत अस्वस्थ होणं, हा आपला नेहमीचाच अनुभव असतो. घटना सुखाची असो वा दुःखाची. त्या सुख–दुःखाच्या प्रत्येक हेलकाव्यानं मन सतत खालीवर होत असतं. याचं कारण शोधलं, तर त्या – त्या घटनांना आपण दिलेलं सत्यत्व किंवा खरेपण हे असतं. पण वस्तुस्थिती पाहिली तर, आपण मानतो एवढं सत्यत्व त्या घटनांना कधीच नसतं. जन्म–मृत्यू, संचय–व्यय – अशा अनेक द्वंद्वांना स्वप्नातल्या ढोल बडविण्याइतकंच तात्कालिक, पण न टिकणारं महत्त्व, असल्याचं आपल्या लक्षात येतं आणि मग, खऱ्या अर्थानं जाग येते. जागृत होऊन पाहिलं की, प्रपंच स्वप्नासारखा वाटतो. त्याच्या सुख–दुःखांना फार खरेपण रहात नाही. त्यामुळं होणारी चित्ताची सततची घालमेल थांबते. आपण केवळ देह नसून देवही आहोत किंवा होऊ शकतो याचं भान येतं. मग प्रपंचातल्या साऱ्याच गोष्टींचं आणि घटनांचं योग्य ते मोल केलं जातं आणि खऱ्या शांततेचं, आनंदाचं महाद्वार उघडतं.

..८..

जागे होता दु:ख न उरते, सुखही ठरते फोल,
गड्यांनो स्वप्नामधले ढोल, सारे स्वप्नामधले ढोल ! ।।धृ।।

सनई मंजुळ मूल जन्मता ।
विव्हळते कुणि दु:ख सोसता ।
ऊर पिटी कुणि जिवलग जाता ।
जागृति येता फोल, सारे स्वप्नामधले ढोल ! ।।१।।

कुणि मारितो पहा बढाया ।
कुणि कुणाच्या पडतो पाया ।
साठवितो, कुणि दवडी वाया ।
भेदच सारा फोल, सारे स्वप्नामधले ढोल ! ।।२।।

देह नव्हे मी हे जाणवता ।
देवत्वाचे भान जागता ।
प्रपंच हेही स्वप्नच कळता ।
दीना करि रे मोल, सारे स्वप्नामधले ढोल ! ।।३।।

(ट्रॅक नं. १०८)

प्रत्येक जिवाचा उद्धार करणारी ईश्वरी यंत्रणा म्हणजे गुरू होत. ते जगात दोन रूपानं राहतात. माणसाच्या अंतरंगात अव्यक्त रूपात आणि जगामध्ये संत–सत्पुरुषांच्या रूपानं व्यक्त रूपात. हे व्यक्त रूपातले बाह्य गुरू, अंतर्यामीच्या गुरूची जिवाला ओळख करून देतात, गाठ घालून देतात. फक्त त्यासाठी आपण अहंभावाचं आवरण, भगवंताच्या विस्मरणाची प्रदीर्घ निद्रा – हे सारं सोडून त्रिगुणांच्या पलीकडं जायचा प्रयत्न करणं, गरजेचं असतं. ते केलं तर मात्र, या खऱ्या गुरुभेटीनं माणसाचं चित्त खरं शांत होतं, प्रसन्न होतं – हा अनुभव या पदात मांडला आहे. ही गुरुभेटीची विद्या देणारे गुरूंचे गुरू – श्री दत्त अवधूत आजही माणसाच्या आतल्या आणि बाहेरच्या विश्वात विद्यमान आहेत. गरज आहे ती फक्त आपण जागं राहायची, ते जागे असल्याचं भान ठेवायची आणि त्यांच्या भेटीसाठी सदैव प्रयत्नशील राहायची.

..९..

जागृत आपण हृदयी असता मज कसली चिंता ?
माझे हृदयीच्या अवधूता ! ।।धृ।।

रजोगुणाचे विणले जीवन ।
सत्त्वतमाची तयात गुंफण ।
सुखदुःखाचे भोगी मिश्रण ।
त्रिगुणातीता हृदयी धरिता आनंदच ये हाता !
माझे हृदयीच्या अवधूता ! ।।१।।

डोळ्यांवरती 'मी' चा सारा ।
तव विस्मृतीची प्रगाढ निद्रा ।
दीन शोधितो सदा निवारा ।
अंतरिचा 'गुरु' 'दत्त' गवसता शांत किती करि चित्ता !
माझे हृदयीच्या अवधूता ! ।।२।।

(ट्रॅक नं. १०९)

मानवी जीवनातल्या गुरूंच्या महत्त्वाविषयी आणि त्यांच्या कार्याविषयी खूप काही आजवर सांगितलं गेलं आहे आणि पुढंही सांगितलं जाईल. ते सर्व मोलाचं आहे, खरंही आहे. पण या पदामध्ये गुरूंना ओळखणाऱ्या शिष्यांची थोरवी गायली आहे. कारण, गुरू आपल्या परीनं कितीही थोर असले तरी, ते देहात आले की, शिष्यांच्या देहबुद्धीमुळं अशा देहातल्या गुरूंचं खरं स्वरूप जाणणं, हे फार कठीण असतं. म्हणून गुरू देहात असताना, गुरूला ओळखणारे शिष्य हे खरोखर धन्य होत. हे या पदामध्ये श्री गोंदवलेकर महाराज यांचे थोर शिष्य, श्री ब्रह्मानंद यांच्या थोरवीच्या निमित्तानं सांगितलेलं आहे आणि गोंदवलेकर महाराज देहधारी असताना ब्रह्मानंदांसारख्यांनी बुद्धिभेद होऊ न देता, श्रींना कसं ओळखलं आणि त्यांच्या आज्ञांचं पालन करून ब्रह्मानंद कसे मुक्त झाले, गुरुपदी गेले याबद्दल ब्रह्मानंदांविषयी शेवटी अत्यंत आदरानं धन्योद्‌गारही काढले आहेत.

..१०..

रहस्य जे जाणती तयांनी ओळखिले गुरुस ।
धन्य धन्य ते शिष्य
जयांनी ओळखिले गुरुस ।।धृ।।
पूर्णब्रह्म कधि कृपाळूपणे ।
धरिते आकृतिस ।।१।।
अपुल्या परि जरि देह दिसे तरि ।
ईश्वर हा खास ।।२।।
बाह्य वागणे सामान्यांसम ।
देश तसा वेश ।।३।।
मुक्त असोनि सांभाळिति किति ।
बाह्य बंधनास ।।४।।
बद्ध जागविति, आणिक देती ।
गती साधकांस ।।५।।
अतर्क्य लीला खेळ मांडिला ।
गूढ देहबुद्धीस ।।६।।
बुद्धिभेद टाळून शिष्यवर ।
जाणति स्वरूपास ।।७।।
गुरुआज्ञा हे एकच साधन ।
पळ न विकल्पास ।।८।।
दीन लीन अति ब्रह्मानंदी ।
अभेद जे गुरुस ।।९।।

(ट्रॅक नं. ११०)

गुरुशिष्यसंबंध हा अत्यंत पुरातन, अपरिहार्य आणि अत्यंत उपयोगी संबंध आहे. तीच गोष्ट देव आणि भक्त या संबंधाची आहे. लौकिकदृष्ट्या येणारा गुरुशिष्यसंबंध हा विशिष्ट विद्येपुरता मर्यादित असला तरी, परमार्थात येणारा हाच संबंध मात्र व्यापक आणि अनेकदा खूप विचार करायला लावणारा संबंध आहे. एकमेकांचा अयोग्य फायदा घेणारे संबंध जरी क्षणभर सोडून दिले तरी, जे सामान्य गुरुशिष्यसंबंध राहतात, त्याचेसुद्धा इतके प्रकार आहेत की, आदर्श संबंध निर्माण होणं किती कठीण आहे, याचा विचार केला तरच कल्पना येते. अशाच तऱ्हेनं गुरूला वापरू पहाणाऱ्यांच्या संबंधावर एक औपरोधिक प्रकाश या पदामध्ये पडतो आहे. हा वापर इतक्या प्रकारचा आहे की, अशा शिष्यांसाठी त्यांच्या खऱ्या उद्धारासाठी गुरूला किंवा देवाला, आता वेगळाच अवतार घ्यावा लागेल की काय, अशी शेवटी व्यक्त केलेली शंका, खरोखर खऱ्या साधकाला अंतर्मुख करते.

..११..

कितीक आमुची कामे अडली, करीलसा हो कुणी हवा,
कामासाठी देव हवा हो, कामासाठी गुरू हवा हो,
स्वस्त, शक्यतो फुकट हवा ! ।।धृ।।

अभ्यासाची अन् कष्टांची
कुचराई ही सदा आमुची
प्रदक्षिणांवर प्रसन्न होउनि
यश देणारा कुणी हवा ! ।।१।।

गृहकलहाने कुणी ग्रासले
कुणि चिंतेने त्रस्त जाहले
औषध त्यावर स्वत:च घेउन
अम्हा मुक्त करविता हवा ! ।।२।।

धनजीवन हे स्वार्थासाठी
उधळू आम्ही करेहि जगती
दोष आमुचे प्रकट न करिता
दूर करिलसा कुणी हवा ! ।।३।।

आत्मपरीक्षण, विचार नाही,
प्रयत्न ना अनुताप कुठेही
दीन म्हणे म्हणे रे आम्हांसाठी
होइल का अवतार नवा ? ।।४।।

(ट्रॅक नं. १११)

सद्‌गुरूंचं आपल्यासारख्या शिष्यांच्या जीवनातलं खरं कार्य ओळखणं, ठरवणं हे खरोखर अत्यंत दुर्घट काम आहे. त्यांतल्या त्यात मोठ्या दयाबुद्धीनं आपल्याला या भवसागरातून तारून नेणं– म्हणजेच, या प्रपंचाच्या भुलभुलैयातून शाश्वत सत्याकडे, आनंदाकडे नेणं हे सद्‌गुरूंचं सर्वांत मोठं कार्य म्हणावं लागेल. आपल्याला वाटणारा आपल्या तथाकथित कर्तृत्वाचा पोकळ अभिमान, चित्ताची सदैव चिंतित अवस्था, काळाच्या भ्रामक पडद्याखाली जगण्याची लागलेली दुर्बळ सवय, खऱ्या सुखाची कल्पनासुद्धा नसताना, स्वतःच्या कल्पनेतल्याच काही गोष्टींना सुख समजून त्यांचा पाठपुरावा करण्याची धडपड आणि त्या कल्पनांनाच खरं सुख समजून, मी ते सर्व एक ना एक दिवस या प्रपंचातून मिळवीनच असा भ्रम, अशा आपल्या अनेक समजुती सद्‌गुरूंच्या सदैव लक्षात येतात. मग अनेक घटना, वेळी घडवून आणून, अनुभव देऊन, विचार करायला लावून शिष्याचा एकेक भ्रम ते दूर करतात. शिष्याबद्दलच्या दयाबुद्धीनं त्याला ते कसं तारून नेतात, तो अनुभव आणि खात्री या पदात व्यक्त झाली आहे.

..१२..

माझी माय दयासिंधु, गुरुमाय दयासिंधु
तरवील भवसिंधु ।।धृ।।

जरी पहा मी ओढित घाणा
वाटे मज सम कुणि न शहाणा
सावध करुनी भूल काढिते, माय दयासिंधु ।।१।।

पाइक अविरत मी चिंतेचा
सदा पहा मी दास 'उद्या'चा
काळाहातुनि मला सोडवी, माय दयासिंधु ।।२।।

करीन हे मी, करीन ते मी
संसारातुन सुख मिळविन मी
मज दीनाचा भवभ्रम काढी, माय दयासिंधु ।।३।।

(ट्रॅक नं. ११२)

परमार्थाचा मार्ग एकापरीनं खरोखरच कठीण आहे. कारण तो बराचसा मनाचा आणि त्यातही पुन्हा मनाच्या नेहमीच्या सवयीच्या उलट जाण्याचा आहे. या मार्गात जसा सद्‌गुरूंचा मोठा आधार आहे, तसाच साधकांना दुसरा मोठा आधार आणि मदत होते, ती सत्संगाकडून. खरं सांगायचं तर, सत्संगाचं खरं सामर्थ्यच आपण ओळखत नाही. साधनेत कष्टानंसुद्धा जे मिळवणं कठीण आहे, ते सत्संगानं सहज मिळत असतं. त्यामुळं सत्संगाची ओढ या पदात परोपरीनं व्यक्त झाली आहे. निर्भेळ सत्संग एकदा माणसाला लाभला की, नेहमीच्या प्रपंचातल्या बेगडी आणि भ्रामक संगाचा फोलपणा कळतो आणि एकदा सत्संगाचं महत्त्व कळलं, त्याची गोडी लागली की, मग मात्र ध्यानी मनी असा सत्संग वारंवार मिळावा, अशी ओढ लागते. या पदात भवभयातून सोडवणारा हा सत्संग, हाच जणू परमेश्वर आहे, असं मानलं आहे आणि त्याला उद्देशून, तू सदैव मजवर प्रसन्न हो, अशी वैशिष्ट्यपूर्ण प्रार्थना करून म्हटलं आहे की, तुझं स्वरूप व्यापक आहे. तू जसा कुणा सत्पुरुषांच्या किंवा निर्मळ साधकांच्या रूपानं व्यक्त होतोस, तसा संतांच्या बोधवचनांतूनही व्यक्त होतोस, तसाच तू निसर्गातल्या पानाफुलांतुनसुद्धा व्यक्त होतोस. कुठल्याही रूपात तू मला भेट, पण भेट. ही सत्संगाची ओढ साधकांना परमार्थाच्या वाटचालीत खचितच मोलाची वाटेल.

..१३..

साद घालितो सत्संगा । उद्धरी भवभयभंगा, तारी रे ।।धृ।।

थोर भाग्य माझे, नष्ट भ्रमाचे ओझे ।
बेगडी असंगाचे, फोलपण दावीशी गा ।।१।।

संग मागे मन, संग मागे तन ।
तुझ्या संगे समाधान, खरे अनुभवले गा ।।२।।

कैसे ते कळेना, मन हे सोडीना ।
सदा तूचि ध्याना, अता कसा येशी गा ।।३।।

तुज प्रगटाया पाही, पानेफुले काही घेई ।
जनावचनातुनि येई, परि भेट देई गा ।।४।।

सदा उठोनिया रोज, वाटे आळवावे तुज ।
दीन म्हणे मज, सदा कसा भेटशी गा ।।५।।

(ट्रॅक नं. ११३)

श्री गोंदवलेकर महाराजांना उद्देशून लिहिलेलं हे पद तशा सर्वच भक्तवत्सल संतसत्पुरुषांना लागू असलेलं आहे. अशा सत्पुरुषांकडे येणाऱ्या लोकांचे अनेक वर्ग असतात. काही त्यांना ओळखतही नाहीत. काही ओळखतात, पण ते केवळ प्रापंचिक कामांसाठी त्यांच्याकडे येतात. तर काही त्यांना ओळखतात, त्यांच्यावर पूर्ण निष्ठा आहे असं म्हणतात, पण वेळ येताच क्षणात ते गुरूपेक्षा स्वतःच्या प्रपंचाला अधिक महत्त्व देतात. या तीनही वर्गातल्या लोकांना समजून घेऊन त्यांचा सांभाळ गुरू करतातच. पण चौथ्या वर्गातले लोक खरे निष्ठावान असतात. गुरूंच्या उपदेशाप्रमाणं वागण्याचा प्रामाणिक प्रयत्न करणारे असतात. अशांवर अर्थातच गुरूंचं विशेष प्रेम असतं. या पदात असं म्हटलं आहे की, या कुठल्या ना कुठल्या वर्गात आपण बसत असूच, पण निष्ठेनं गुरुपायी राहिलो तर ते सांभाळतीलच सांभाळतील.

..१४..

सांभाळ किती करणार, अमुचा ।।धृ।।
नाव जाणे ना तुमचे ।
काय नाते तुमचे त्याचे ।।
पदोपदी अशा कितिका,
जन्मोजन्मी राखणार ! ।।१।।
तुम्हा ओळखती जे जे ।
येती भेटी कामकाजे ।।
हिंगजिऱ्याचे ग्राहक,
तरी तुम्ही जपणार ! ।।२।।
जे जे म्हणती आम्ही तुमचे ।
तरी होती क्षणि जगाचे ।।
कधी नाही बोल त्यांना,
ना कंटाळा करणार ! ।।३।।
शुद्धपणे वचनी तुमचे ।
मार्ग चालती नामाचे ।।
अंतर्बाह्य पोटी त्यांना,
आनंदुनी धरणार ! ।।४।।
इतुक्या जना उद्धरीता ।
कसे उपेक्षाल आम्हा आर्ता ।।
दीन म्हणे असो तसे ,
तुमचे पायी राहणार ! ।।५।।
सांभाळ तुम्ही करणार, खचितचि ।।
सांभाळ तुम्ही करणार, अमुचा ।।

(ट्रॅक नं. ११४)

जे जन्मतःच भगवंताचं प्रेम आणि त्याच्या प्राप्तीची कुवत घेऊन अवतरतात. त्यांची तयारी काही आगळीच असते. पण सर्वसामान्य प्रापंचिकाला मात्र प्रपंचातले, व्यवहारातले टक्के-टोणपे खाऊनच, कधीतरी, तोसुद्धा भाग्यवशातच, जगाचा फोलपणा कळतो आणि मग सद्‌गुरूंचं नि भगवंताचं प्रेम उत्पन्न होतं. आध्यात्मिकदृष्ट्या मनुष्य जागा होतो आणि वाटचाल करायला लागतो. त्याचा प्रवास कसा कसा होतो त्याचा अनुभव आणि मनाची स्थित्यंतरं ही कशी कशी होत जातात, ते या पदात नेमकेपणानं मांडलेलं आहे. गुरूंच्या कृपेनं प्रपंचाचं सत्य स्वरूप कळायला लागल्यावर बद्धावस्थेत आपण कसे गुरफटल्यासारखे वागत होतो आणि प्रपंचासाठी, तो पुरा करण्यासाठी, केलेले अपार कष्ट कसे फोल होते, हे राहून राहून आठवतं. प्रपंचासाठी, त्यातल्या फसव्या सुखाच्या आशेपोटी माणसाला दीनपणा कसा येतो आणि तोच माणूस जागृत झाल्यावर भक्तीसाठी, भगवंताच्या प्राप्तीसाठी खऱ्या अर्थानं दीन का होतो, हेही या पदात स्पष्ट झालेलं आहे. सामान्य जीवनात ही सारी विधायक करामत घडवून आणणाऱ्या सद्‌गुरूंचं मोल आणि त्यांच्या सहवासाची ओढ साधकाच्या दृष्टीनं कशी वाढत जाते, हा अनुभव आपण कुणीही साधकांनी घेऊन बघण्यासारखाच आहे, असं म्हणावंसं वाटतं.

..१५..

तुझी मज लागलीसे आस ।
भेटीलागी जीव कासावीस, आता रे ।।धृ।।

ध्यानी मनी स्वप्नी होता देह, माझ्या रे ।
प्रपंचाचे काम सर्वस्व रे, होते झाले ।
विकारांचे मन होते दास रे, तेव्हा ।।१।।

गोळा केले सारे सारे फोल, ठरले रे ।
मना सांभाळीता झालो दीन, हीन रे ।
कळो आले तव वचनी रे, सारे ।।२।।

बोध कृपा शब्दे सावधान, केले रे ।
प्रपंचाचे रूप दाविये‌ले, सत्य रे ।
बोध मनी जागविता चुकतो रे, रोज ।।३।।

अपराध माझे पोटी घाली, दयाळा रे ।
जीव शांत करी ठेवी पायी, तुझिया रे ।
दीन म्हणे भक्तीसाठी दीन रे, तुझिया ।।४।।

(ट्रॅक नं. ११५)

प्रपंचाची कर्तव्यं करीत असताना भगवंताचं स्मरण ठेवावं, हे तर चांगलंच. पण प्रपंचातल्या रोजच्या उलाढाली, स्वार्थ आणि दंभ यांनी भरलेला अपरिहार्य लोकव्यवहार, विकारांचा कळत–नकळत वावर – अशा अनेक गोष्टींमुळं हे स्मरण टिकवणं कठीण जातं, हा मात्र अनुभव आहे. अशा वेळी या व्यापातून मुद्दाम वेळ काढून, बाजूला जाऊन – हे स्मरण करणं, टिकवणं गरजेचं होतं. मग हे बाजूला जाऊन बसणं देवासमोर, संतांसमोर किंवा निसर्गात, मंदिरात, मठात – कुठंही असो. असं बसणं तासाभरासाठी असो, एखाद्या दिवसासाठी असो किंवा शिबीर – सप्ताहाच्या निमित्तानं काही दिवसांसाठी असो. अशा ठिकाणी गेल्यावर आपलं देवप्राप्तीचं, भगवंताच्या स्मरणाचं साधन साध्य व्हावं, निदान असा मिळालेला दुर्मीळ वेळ कारणी लागावा म्हणून मनाच्या ज्या थोड्या निर्धारानं आपण स्वार्थ–दंभाचा प्रपंच बाजूला ठेवून आलो त्या निर्धाराची जाणीव बाळगावी, तिथं जे वातावरण आणि जो परिणाम व्हावा असं वाटतं, त्याची जाणीव ठेवावी. आणि संतांकडून, भगवंताकडून परत जाताना जे घेऊन जायचं त्याची जाणीव राहावी, हे गरजेचं वाटतं. ही सारी जाणीव राहावी म्हणून भगवंताला, संतांना तळमळीनं प्रार्थना करणंही गरजेचं आहे. ते सारं या भावपूर्ण पदात नेमकेपणानं आलेलं आहे.

..१६..

भावे जोडोनिया हात ।
संतचरणा विनवीत ।।धृ।।

आलो सोडुनीया आप्त ।
स्वार्थदंभाचे गणगोत ।
द्यावी भक्तांची संगत ।
संतचरणा विनवीत ।।१।।

रागलोभ कुळ माझे ।
धैर्ये टाकिले मी ओझे ।
मज देवा घ्या पदरात ।
संतचरणा विनवीत ।।२।।

सुटो नश्वराचा मोह ।
जावो समूळ संदेह ।
जागो देव हृदयात ।
संतचरणा विनवीत ।।३।।

सुखे जाईन माघारी ।
देव घेउनी अंतरी ।
सांभाळा हो दीनभक्त ।
संतचरणा विनवीत ।।४।।

(ट्रॅक नं. ११७)

या पदामध्ये शरणागतीची एक भावपूर्ण अवस्था प्रतिबिंबित झालेली आहे. काहीही करा, पण मला पायाशी ठेवा, अशी सद्‌गुरूंना उद्देशून केलेली प्रार्थना या पदाच्या केंद्रस्थानी आहे. आपल्याला होणाऱ्या सद्‌गुरूंच्या भेटीचं महत्त्व आपल्याला वाटणं किती आवश्यक आहे, हे साधकांना सांगायला नकोच. या पदामध्येसुद्धा आपल्या नेहमीच्या हमालीच्या जगण्यात, अवचित पूर्वपुण्याईनं सापडलेला गुरुभेटीचा ठेवा किती अनमोल वाटतो, ही जाणीव व्यक्त झाली आहे.

..१७..

काही करुनि आता देवा ।
तुमचे पायी ठाव द्यावा ।।धृ।।

किती जन्म आले गेले ।
कसे किती कोठे गेले ।
नकळे कुठले पुण्य म्हणुनि ।
तुमची भेटी जाली जीवा ।।१।।

दया नाही धर्म नाही ।
कर्म सारे स्वार्थापायी ।
येरझारा करिता करिता ।
खरा गवसला विसावा ।।२।।

तुमचे पायी समाधान ।
घडली भाग्ये ओळखण ।
दीन म्हणे गुरुदेवा ।
नच साहे अंतर जीवा ।।३।।

(ट्रॅक नं. ११९)

परमार्थ ही अत्यंत कठीण शिकार आहे, असं म्हटलं आहे. ते अनेक अर्थांनी खरं आहे. पण हा अत्यंत कठीण उद्योग असूनसुद्धा, तो सोपा करून ठेवणारे कुणी अलौकिक कारागीर असतील तर ते म्हणजे सद्‌गुरू होत. इतर अनेक उद्योगांत, शास्त्रांतसुद्धा कुशल कारागीर असतात पण त्यांचा लाभ व्हायला त्यांच्याकडं जावं लागतं. त्यांच्या मनाप्रमाणं, तंत्राप्रमाणं वागावं लागतं. पण या सद्‌गुरुरूपी कारागिराचं वैशिष्ट्य असं की, त्यांच्याकडं येणाऱ्याला मुक्त करण्याची त्यांची करामत तर ते करतीलच, पण त्यांच्याकडं येऊ न शकणाऱ्या आणि म्हणूनच त्यांना आपल्याकडं बोलावणाऱ्याकडं जाऊन, त्यालासुद्धा देहबुद्धीतून सोडवण्याची आपली करामत ते करतील. म्हणून ज्यांना गुरूचं महत्त्व तर पटतं आहे, त्यांच्या कृपेची गरज तर वाटते आहे, त्यांच्या मार्गानं जायची तळमळ तर वाटते आहे, पण प्रपंचाचा मायापाश तोडून तिथंपर्यंत जायची ताकद कमी पडते आहे, या अर्थानं दुबळ्या, पण आर्त भक्ताची स्थिती या अभंगात प्रतिबिंबित झाली आहे. त्यामुळं उरणारा प्रार्थनेचा मार्ग यात आला आहे आणि साधनेच्या वाटचालीत अशा टप्प्यावर असलेल्या साधकांना तो जवळचा वाटेल, उपयोगी ठरेल.

..१८..

माझे प्रपंची या गुरुराया ।
तुम्हा विनवितो पाया ।।धृ।।

देही घर मांडियेले ।
द्वार इंद्रिये लाविले ।।१।।

विकारांचे गणगोत ।
भ्रम पसारा मांडीत ।।२।।

सुख आभास कारंजी ।
आशापाश घाली रुंजी ।।३।।

असा माझा हा प्रपंच ।
परी तोडवेना पाश ।।४।।

तुमची ओढ अंतरात ।
मज येणे ना जमत ।।५।।

दीन म्हणे पाय अडे ।
म्हणुनि घालितो साकडे ।।६।।

(ट्रॅक नं. १२०)

परमार्थातली सर्वांत मोठी, चटकन पुढं केली जाणारी सबब म्हणजे वेळ नसण्याची. त्यातच, खरा परमार्थ तर म्हणतोच की, आपली कर्तव्य व्यवस्थित पुरी करा. त्यामुळे एकेक प्रापंचिक कर्तव्याचं नाव पुढे करून, माणूस नामाला, सत्संगाला आयुष्यभर सबबी सांगतो. त्याचा एकच ठेका असतो की, मला हे सगळं पटलेलं आहे. मी ते नक्की करणार आहे. फक्त आत्ताचं एवढं हातातलं काम झालं की, लगेच हे नामाचं आणि परमार्थाचं काम हाती घेणार आहे. या बाबतीत शिक्षण घेणारा युवक ना अपवाद, ना निवृत्त झालेला वृद्ध अपवाद. जीवनातल्या प्रत्येक अवस्थेतल्या टप्प्यावर असलेल्या आणि प्रामाणिक वाटणारी अडचण पुढे करणाऱ्या माणसांची स्थिती, या पदात आली आहे. ती ती अडचण प्रामाणिक नाही, असं नाही. पण केवळ तिच्यामुळं परमार्थ करण्याचं जणू काही थांबलं आहे, असं म्हणणं हे खचितच रास्त नाही. कारण खरा परमार्थ आपल्या कर्तव्याच्या आड कधीच येत नाही. कर्तव्याचा वापर ढालीसारखा करून जीवनाचं सार्थक करण्याच्या विद्येला वेळ देण्यात, आपण चालढकल करतो. असं करणं म्हणजे जन्मदात्या ईश्वराच्या बाबतीत कसूर करणं आणि स्वतःच्या उद्धाराचं कर्तव्य करण्यातही कसूर करणंच होय. म्हणून वेळीच आपण सावध व्हावं, हे हिताचंच ठरेल.

..१९..

नाम घेणार, गाथा वाचणार, सत्संगाला येणार ! केव्हा ?
जरा मोकळा होताच देवा तुमची सेवा करणार ! ।।धृ।।

शिक्षण झाले,उद्योग केले
नोकरीसाठी अर्ज केले
चिकटलो की कुठेतरी
चणचण सारी संपणार
आणि, जरा मोकळा होताच देवा तुमची सेवा करणार ! ।।१।।

काट्यावरचे काम माझे
घरीदारी सदा ओझे
लग्नानंतर शेअरिंग होईल
व्याप कमी होणार
आणि, जरा मोकळा होताच देवा तुमची सेवा करणार !।।२।।

बायकोपोरे घर भरे
पाहुणेरावळे ताप सारे
मार्गी लावले साऱ्यांचे की
व्याप माझा संपणार
आणि, जरा मोकळा होताच देवा तुमची सेवा करणार ! ।।३।।

कष्ट काळजी सदा वाही
शरीर सारे पिचून जाई
मलाच नेती दवाखान्यात
बरा होऊन येणार
आणि, जरा मोकळा होताच देवा तुमची सेवा करणार ! ।।४।।

दीन म्हणे तळमळीने
मुद्दल नेले प्रपंचाने
दाता राहिला वायद्यावरी
कर्ज कसे फिटणार ?
अशा मधून कोणी काही नाही का हो शिकणार ? ।।५।।

(ट्रॅक नं. १२१)

माणूस पोटासाठी नोकरी – उद्योग करतो हे आवश्यक आणि योग्यच आहे. पण ती नोकरी हेच सर्वस्व मानणं म्हणजे माणसाला पशुपणाकडे खाली आणणंच होय. कारण माणसाला पोट भरण्यापलीकडं, स्वतःचा उद्धार करून घेण्याचंही कर्तव्य आहे. त्यासाठी पूर्णत्वाचं म्हणजे, भगवंताचं स्मरण सतत करणं ही त्याची देवाची चाकरी होय. लौकिक नोकरीतून पैसा मिळावा तसा या अनुसंधानाच्या नोकरीतून त्याला आनंदाची साधीच पण सदैव गोड लागणारी भाकरी मिळते. ती देवाची चाकरी त्याला देवपण गाठून देते, म्हणून ही चाकरी मिळावी, अशी या पदात केलेली प्रार्थना सर्व साधकांना लागू होणारीच आहे.

..२०..

कधि न उपाशी, कधि न तुपाशी, सदा गोड भाकरी
देई तुझीच रे चाकरी, देवा तुझीच रे चाकरी ।।धृ।।

शेतामध्ये, उद्योगी वा
पोटार्थी जरि देह झिजावा
धना जोडिते, परि न राघवा
उद्धारास्तव पुरी न पडते, जगातील नोकरी ।।१।।

कितीक आले, कितीक गेले
जगी कुणाचे नाव न उरले
फेऱ्यामध्ये फिरत राहिले
दास तुझे परि मुक्त जाहले, धरुनि तुझी नोकरी ।।२।।

पोटासाठी देह झिजू द्या,
अनुसंधानी परी राहु द्या
आनंदाचा मोबदला घ्या
दीन म्हणे रे जागृत वांछिति, सदा तुझी नोकरी ।।३।।

(ट्रॅक नं. १२२)

* २. आरत्या *

(आरत्यांच्या भूमिकांसह)

मनुष्याच्या विश्वामध्ये देवाइतकी उदात्त कल्पना नाही आणि मनोज्ञ वास्तव नाही. मनुष्य स्वतःच एका बाजूनं शरीरासारख्या दृश्याचा तर मन, चैतन्य यांसारख्या अदृश्यांचा अद्वितीय आविष्कार आहे तर, तशाच असलेल्या असंख्य मानवांचा, प्राणिमात्रांचा, सृष्टीचा आणि अनादी अनंत विश्वाचा निर्माता परमेश्वर दृश्य–अदृश्याचा किती कल्पनातीत, एकमेवाद्वितीय आविष्कार असेल ! मनुष्य जसा साक्षीरूपानं तटस्थ पण, शरीर, कर्मेंद्रियं, ज्ञानेंद्रियं यांनी असंख्य कर्मं करणारा, तसाच हा परमेश्वरही शिवरूपानं साक्षी, खरा कर्ता आणि शक्तिरूपानं अवघ्या सृष्टीचा अवाढव्य व्यापार रचणारा ! हे देवाचं स्वरूप सहसा लक्षात न येणारं आणि बुद्धिमंतांनाही चकवणारं आव्हान आहे. हे सारं उलगडणारी ही देवांची आरती. पहिल्या कडव्यात ही आरती निर्गुणाची कीर्ती आणि महती गाते तर, माणसानं खूप विचारपूर्वक हेतुतः निर्माण केलेल्या सगुण मूर्तिपूजेचं रहस्य दुसऱ्या कडव्यात स्पष्ट करते आणि या दोन्ही स्वरूपांच्या स्मरणात आपलं कर्तव्य घडत राहावं, अशी कल्याणकारी प्रार्थनाही, ही आरती देवांना करते.

देवांची आरती

देवांची आरती, लाविल्या भावांच्या ज्योती ।।धृ।।

अरूप तुम्ही, निर्गुण तुम्ही विश्वाचे आधार ।
शिवरूपे राहुनी पहाता शक्तीचा व्यवहार ।
मायामय या दीन जीवांना कशी कळे महती ।।१।।

म्हणुनी बनवुनि मूर्ती आम्ही आवाहन केले ।
विविध रुपाने तुम्ही येउनी घर पावन केले ।
कर्तव्यांत सदा घर राहो मन चरणांवरती ।।२।।

(ट्रॅक नं. १०६)

अनेक अमूल्य, आदर्श कुठली अकारण तडजोड न करता थेट जगत गेलं तर, कुठलंही मानवी जीवन कसं देवत्व प्राप्त करतं, याचा दुर्लभ वस्तुपाठ म्हणजे श्री रामरायाचं जीवन होय. त्यामुळंच अनेक सद्‌गुण प्रत्यक्ष जगून राम गुणरूप तर होतोच, पण अशा जीवनामध्ये साक्षात निर्गुणालाही विश्राम म्हणजे विश्रांती घ्यावीशी वाटते. म्हणून राम सगुणनिर्गुणाचा आदर्श बनतो. ऐतिहासिक व्यक्ती म्हणून सगुण, आणि अंतर्यामी म्हणून निर्गुण. त्याच्या जीवनाची शुद्धता ही इतकी उच्चकोटीला जाते की, त्याचं नामसुद्धा जिवाला या कलियुगाच्या दुर्धर काळात तारून नेतं.

इथं आरतीत पहिल्या कडव्यात, प्रथम विकारांच्या तांडवामुळं सत्प्रवृत्त दीन भक्तांची होणारी अवस्था, उद्धरण्यासाठी शक्ती देण्याची प्रार्थना आणि यांसाठी भक्त–हृदयात सद्‌बुद्धीच्या अंतर्ज्योती लावून मांडलेली प्रतीक्षा, हे सारं आलं आहे. तर दुसऱ्या कडव्यात स्वतःची कठोर पण गरजेच्या तपाची असमर्थता व्यक्त करून रामरायाचं, देवाचं नाम मात्र, कंठी निर्धारानं आणि आशेनं धरून ठेवल्याचं आर्ततेनं सांगितलं आहे. ते या खात्रीनं की, या कंठी धरलेल्या नामात राम आहे आणि त्याला प्रकट करण्याचं सामर्थ्यही आहे.

श्रीरामाची आरती

आरती गुणरूप रामा, निर्गुणविश्रामा ।।धृ।।

काळ कलीचा दुर्धर आम्हांवरती हा आला ।
जीवजीव भयभीत विकारांपुढती हा झाला ।
दे तव शक्ती दासा दीना जपण्या सद्धर्मा ।
सद्‌बुद्धीच्या अंतर्ज्योती लावियल्या धामा ।।१।।

किती युगे अन् कितीक नामे घेशी अवतार ।
तुला आणण्या आम्हाजवळी तप नाही थोर ।
परि ये सगुणी, ना तरि येई नामी रे रामा ।
पाही आशा धरुनी आम्ही घेत तुझ्या नामा ।।२।।

(ट्रॅक नं. १४८)

सर्व विश्वात भरून राहिलेल्या आणि तरीही अनंतपणे शिल्लक राहिलेल्या भगवंताचं स्मरण, त्याचं आपलं नातं यांचं चिंतन घडवणारी ही विश्वात्मकाची आरती. या निराकार, निर्गुण आणि त्यामुळंच कुणालाही, कुठंही, कुठल्याही रूपात दर्शन देऊ शकणाऱ्या परमात्म्याला अनेकजण मुकतात. त्यांना हा दैवी प्रसाद अंतरतो. याचं कारण परमात्म्याची ओळखच मनाला होत नाही. त्याचा कधी होणारा क्षणिक बोधही मनावर ठसत नाही. झालाच तर तो बोधपाठ होत नाही. स्थिर होत नाही. रुजत नाही. त्यामुळंच सर्व जगाप्रमाणंच आपल्यावरही सदैव कृपा करणाऱ्या या विश्वात्मक देवाला पारखं व्हायला होतं. म्हणून प्रथम, या आरतीत आपल्या आजच्या बेसावध जीवनाचं चित्र आलं आहे. मग ते बेसावधपण टळावं, या विश्वात्मकाचं स्मरण राहावं, अशी प्रार्थना आली आहे. हा विश्वात्मक देव सर्व प्राणिमात्रांतच नव्हे तर, अचेतनातही पाहाता यावा. वृत्तीची बेसावधता, संकुचितता जाऊन व्यापकता यावी. त्यातून समग्र कृती घडाव्या आणि भगवंताच्या इच्छेनं जगण्यातलं अपूर्व समाधान कळावं, लाभावं, अशी तळमळीची प्रार्थनाही यात आहे. ही आरती आत्मपरीक्षणाबरोबर भगवंताच्या दर्शनाची ओढ लावणं, निर्धार घडवणं, अशा अनेक गोष्टीही साध्य करील. आजच्या युगाचं, माणसांचं दर्शन घडवणाऱ्या बोधपाठाच्या अंती श्री माउलींच्या कृपेनं आलेली, ही बोधपाठाची आरती, ही विश्वात्मकाची आरती असल्यानं ती, बोधपाठानंतर म्हणण्याइतकीच, स्वतंत्र आरती म्हणूनही साधनेला उपयुक्तच ठरेल.

विश्वात्मकाची आरती

विश्वात्मका तुजला देवा ओवाळू आरती ।
तुझ्या कृपेचा सदैव होवो बोधपाठ चित्ती ।।धृ।।

१

जन्मोजन्मी प्रपंच करुनी भागलो आता ।
माझे माझे भरुनी ओंजळ मोकळी आता ।।१।।
नातीगोती मानमान्यता पैसा पोकळ ।
स्वार्थी जगती कुणी न भेटे निखळ प्रेमळ ।।२।।
कल्पनेतले मिळण्यासाठी आजवरी श्रमलो ।
ज्याची त्याची कास धरूनी दूर किती गेलो ।।३।।
चैतन्यात्मक तुझीच होती प्रेमळ संगती ।
भान तिचे मज आले आता नित्य टिको चित्ती ।।४।।

२

निसर्गातले रूप अचेतन तसे सचेतन ।
कधी थबकलो नाही घेण्या तुमचे दर्शन ।।१।।
सुष्टदुष्ट वा क्षुद्रभव्य वा ऐलपैल भासो ।
तुजला प्रिय कण विश्वामधला कुणी कुणा त्रासो।।२।।
सर्वांचे हित नित्य घडावे हेतू तव ठायी ।
समग्रतेचे भान मला दे कृतीत अन् हृदयी ।।३।।
तुझे,तुझ्यास्तव,तव इच्छेने जगेन जीवन ।
दीन जिवांना तुझे घडू दे सदैव दर्शन ।।४।।

(ट्रॅक नं. ११६)

सर्व चराचरात परमेश्वर भरलेला आहेच. अडचण आहे ती त्याला, त्याच्या शुद्ध, खऱ्या स्वरूपाला जाणून घेण्याची, त्यानुसार आपलं जीवन घडवण्याची. या साऱ्याची मुळातच कल्पना नसलेल्या माणसांना त्याची कल्पना यावी, ज्यांना कल्पना आहे पण, कोणते प्रयत्न करावे याची माहिती नाही, त्यांना ती माहिती द्यावी आणि प्रयत्न करणाऱ्यांच्या प्रयत्न करताना येणाऱ्या अडचणी दूर व्हाव्या – यासाठी जी परमेश्वरी व्यापक योजना आहे – तिचं सामान्य स्वरूप म्हणजे, गुरुपदव्यवस्था होय. कुठल्या ना कुठल्या स्वरूपात व्यवहारात जशी गुरुपदाची, गुरूंची गरज माणसाला आहे, तितकीच किंवा त्याहूनही अधिक गरज माणसाला सूक्ष्म अशा परमार्थात गुरूंची – गुरुपदाची आहे. सर्वांना जागृत करण्यापासून त्यांचा उद्धार करण्यापर्यंत सर्वत्र साहाय्य करणाऱ्या या कृपामय गुरुपदाचं, त्याच्या कार्याचं स्मरण करणारी, ही गुरुपदाची आरती.

श्रीगुरुपदाची आरती

जय देव जय देव जय श्री गुरुपदा ।
अनंतरूपे प्रकटुनि उद्धरिशी जगता ।।धृ।।

चार खाणींमध्ये जीव जन्मले ।
वासनायोगाने इहलोकी भ्रमले ।
स्वस्वरुपा विसरोनी देहमय झाले ।
जिज्ञासारूपाने तू जागृत केले ।।१।।

कोठुनि आला जीव ओळख तू देशी ।
जगी जगावे कैसे ते तू बोधीशी ।
कोठे जाणे जीवा ध्येय दावीशी ।
सार्थक जीवनाचे साधुनिया देशी ।।२।।

जेथे अडला जीव सावरण्या येशी ।
हाक देती आर्त तू प्रकट होशी ।
धर्म ना पंथ ना भेद ठेवीशी ।
छत्र आभाळापरि सर्वांवरि धरिशी ।।३।।

संत सत्पुरुष अन् अगणित अवतार ।
आजहि नाना रूपे घेशी आकार ।
वर्णन करण्या देवा तुमचे उपकार ।
दीना पडते अपुरे शब्दभांडार ।।४।।

(ट्रॅक नं. १५५)

साऱ्या सृष्टीतून शिकण्याचा महान आदर्श मानवाला देणारे श्री दत्तप्रभू हे आपल्यासारख्या अनेकांचं दैवत आहे. ऐतिहासिक, पौराणिक कथानकांच्या कुठल्याही बाजूनं विचार केला तरी, प्रभुस्वरूप हे अन्य दैवतांसारखं अपार राहातं. त्यात इथं श्री दत्तप्रभूंच्या आरतीत मांडलेलं श्री दत्तस्वरूप, आकलन आणि आचरण यांसाठी ऐतिहासिक अवधूतगीताप्रधान चिंतनीय स्वरूप आहे. ते स्वरूप – मानवरूपात जन्मून ईशस्वरूप होणं, निरासक्ती, सर्वत्र गुरूत्व पाहाणं, सर्वत्र शिकणं – या प्रधान साधनांचा आदर्श आहे. यांच्यामुळं जागृती, स्वप्न सुषुप्ती अशा तीन अवस्था आणि सत्त्व, रज, तम अशा तीनही गुणांचं स्वामित्व त्यांना आलं आहे. आजचा उपलब्ध इतिहास सांगतो की, ते श्री दत्तगुरू हे नाथ, समर्थ, महानुभाव, वारकरी अशा अनेक पंथांचेच काय, पण श्री माणिकप्रभूंसारख्या अवतारात अन्य धर्मीयांचेही गुरू कसे झाले आणि त्यांची कृपा भाकणाऱ्यावर असे लौकिक भेद न करता ते कशी कृपा करतात, ते पाहाण्यासारखं आहे. दत्त शब्दानं आपल्या ठिकाणी, आतबाहेर जे जे परमेश्वरानं दिलं आहे, त्यातून आपल्या उद्धाराचा मार्ग शिकण्याचं आपण ठरवलं, जसं दत्तप्रभूंनी स्वतः केलं तसं करायचं ठरवलं तर, आपला उद्धार श्रीकृपेनं याच शरीरात, आपल्या आजच्या असलेल्या परिस्थितीत, याच जन्मात आपण कसा साधू शकू, हे या दत्तप्रभूंच्या आरतीतून मनःपूर्वक शिकण्यासारखं आहे.

श्री दत्तप्रभूंची आरती

जय देवा जय देवा जय श्री गुरुदत्ता ।
करुणामय, जय निश्चल, निर्मल अवधूता ।।धृ।।

आसक्तीच्या त्यागे जिंकिति संसारी ।
अवस्थात्रयत्रिगुणांचे स्वामित्व करी ।
नाथ समर्थ महानुभाव वारकरी ।
धर्मपंथातीत दत्त कृपा करी ।।१।।

जे जे 'दत्त' आम्हा परमेशे दिधले ।
उद्धाराचे त्यातच गुह्य असे दडले ।
अपुल्या अवतारे ते सकळ कळो आले ।
दत्तप्रभूंनी असंख्य दीन उद्धरिले ।।२।।

(ट्रॅक नं. १२८)

महाराष्ट्रातल्याच काय तर, महाराष्ट्राच्या बाहेरच्याही असंख्य भाविकांचं वत्सल, दयामय दैवत म्हणजे पंढरीचं सावळं परब्रह्म श्री विठ्ठल, श्री पांडुरंग. त्यानं लहान–थोर, गरीब–श्रीमंत, अडाणी–विद्वान – अशा लक्षावधी जिवांना, या बुद्धिभेद करणाऱ्या कलियुगातही – निर्मळ, निःस्वार्थी, प्रेमळ भक्तीची ओढ लावली, हा इतिहासही आहे आणि हे वर्तमानही आहे. पांडुरंगानं अनेकांच्या अंतःकरणातली देवत्वाची विझलेली ज्योत पुन्हा प्रज्वलित केलेली आहे. हे प्रेमळ, कृपाळू दैवत पवित्रतेच्या दानाला पात्र – अपात्र पहात नाही. सर्वांना भरभरून नामप्रेम देतं, आनंद देतं. श्री पांडुरंगाच्या दर्शनानंच काय, पण नुसत्या स्मरणानंही जीव उद्धरून गेलेले आहेत. अशा भगवंताचं प्रेम सर्वांना लावणाऱ्या आणि देवच सर्वस्व वाटणाऱ्या संतमंडळींना तर पांडुरंगाच्या हृदयात निकटचं स्थान आहे, हे सर्वश्रुतच आहे. अशा या श्री पांडुरंगाच्या आरतीत शेवटी एवढीच प्रार्थना आहे की, आपण अपात्र असलो तरी, पांडुरंगानं त्याच्या पायाशी आपल्याला ठाव द्यावा.

श्री पांडुरंगाची आरती

जय पांडुरंगा विठ्ठला सखया ।
ओवाळु स्मरुनी वत्सला सदया ।।धृ।।

ही ओढ कुठुनि तू लावियली भक्तीची ।
हे भाग्य उजळले जाग दिली देवाची ।
माळावर कलिच्या बाग तुझी सत्याची ।
या अभक्त जगती रक्षण भक्तां देशी ।।१।।

ये अपात्र कुणि वा पात्र तुझ्या पायाशी ।
तू दर्शनमात्रे, स्मरणे पावन करिशी ।
जे प्रेमळ, दुर्लभ संत हृदयि तू धरिशी ।
दे अपात्र दीना थारा तव पायाशी ।।२।।

(ट्रॅक नं. १५०)

परमात्म्याच्या अवताराची पूर्ण कला म्हणून प्रसिद्ध असलेले भगवान श्री गोपालकृष्ण यांच्या जीवनाचं आणि कार्याचं नेमकं आणि भावोत्कट चित्र उभं करणारी, ही श्री कृष्णाची आरती. बालसवंगडी पेंद्यापासून, उभं महाभारत जगणाऱ्या आणि जाणणाऱ्या श्री भीष्माचार्यांच्यापर्यंत सर्वांना तितकाच जवळचा आणि तितकाच मार्गदर्शक वाटणारा श्रीकृष्ण, हा अवतारांच्या विलक्षण व्याप्तीचं आणि खोलीचं अपूर्व उदाहरण आहे. गायीगोपाळांत रमणारा कृष्ण वाहत्या यमुनेच्या पाण्याला ओढ लावणारा आहे आणि त्याचबरोबर निर्जीव, जड बासरीलाही आपल्या सहवासानं सजीव, सुरेल करणारा आहे. भक्तांच्या प्रेमळ हृदयांना कृष्णाची ओढ लागली तर नवल नाही पण, त्याचं आत्यंतिक शत्रुत्व करून तरी, त्याची भेट व्हावी म्हणून, त्याच्या शत्रू गणल्या गेलेल्या रथीमहारथींनाही त्याची प्रतीक्षा करावीशी वाटावी, यात श्रीकृष्णाच्या पूर्णत्वाच्या खुणा दडलेल्या आहे. कृष्णकार्याची विलक्षण व्याप्ती शेवटच्या कडव्यात मांडून अखेर त्याच्या भक्तीचंच भान इथं मागितलेलं आहे. ज्यातून त्याच्या कर्मकौशल्यापासून, निर्वाणसाध्यापर्यंतच्या कुठल्या ना कुठल्या गुणसंपदेचा स्पर्श भक्ताला आपोआपच लाभेल, ही आर्त मनीषा आहे.

श्रीकृष्णाची आरती

परमात्मस्वरूपा, जगत्सख्या श्रीकृष्णा ।
अवतारा पूर्णा, हरि रे मम भवतृष्णा ।।धृ।।

पेंद्यावरती जे, प्रेम सुदाम्या तेच ।
जो राधेचा तू , रुक्मिणिचा तू तोच ।।
उद्धवा–अर्जुना, भीष्मसखाही तूच ।
देवकी–यशोदा, परि तो नंदन तूच ।।१।।

त्या गाई–गोपी, कुब्जा असुनी दूर ।
तव लळा लागतो, ये यमुनेला पूर ।।
तव प्रतीक्षेत ते, शत्रु कंस–चाणूर ।
भक्तांच्या हृदयी, नित बासरिचे सूर ।।२।।

तुजपासुन आम्ही, कर्म शिकू की ज्ञान ।
की शस्त्रसज्जता, युद्धनीतिविज्ञान ।।
उद्धारशास्त्र की, गीताऽमृत, निर्वाण ।
दीनास आपुले, भक्तीचे दे भान ! ।।३।।

(ट्रॅक नं. १४६)

विलक्षण बुद्धिमत्ता, कृतिकौशल्य, सेवातत्परता आणि अभूतपूर्व श्रीरामभक्ती अशा गुणांचा मनोज्ञ संगम असलेले श्री हनुमंत शतकानुशतकं असंख्य जनांना शक्ती, बुद्धी आणि भक्तीची प्रेरणा देत आहेत. म्हणून श्री मारुतीराय आबालवृद्धांना प्रिय आहेत. या आरतीच्या धृपदातच सहसा एकत्र न आढणाऱ्या दोन गुणांचा म्हणजे मारुतिरायांच्या विलक्षण बुद्धिमत्तेचा आणि त्यांच्या आत्यंतिक भक्तीचा उल्लेख आहे. आपलं जीवितसाध्य काय असावं, ते साधणारं आपण कसं बनावं, त्यासाठी निःस्वार्थी सेवेची परिसीमा कशी गाठावी – याचं त्यांनी प्रत्यक्ष जगून कसं पथप्रदर्शक उदाहरण घालून दिलं आहे, याचा उल्लेख पहिल्या कडव्यात आहे. तर मारुतिरायांच्या दुर्जेय सामर्थ्याचं वर्णन दुसऱ्या कडव्यात आहे. ज्या गुणांच्या आराधनेची साधकाला यशस्वी होण्यासाठी गरज आहे आणि जे गुण स्वतः श्री मारुतिरायांच्या ठायी आहेत – अशा शक्ती, सेवा, शुद्धी आणि नाममार्गात अचल निष्ठा – या गुणांची कृपा त्यांनी आपल्यावर करावी, अशी प्रार्थना या आरतीच्या अखेरीला केली आहे.

श्री मारुतीची आरती

जय जय हनुमन्ता, ओवाळू...
जय धीमन्ता, जय रामवन्ता ! ...।।धृ।। जय जय..

साध्यसाधका, अतुल सेवका ।
निःस्वार्थाच्या पथप्रदर्शका ।
कपिवर कुलवन्ता ! ...।।१।। ओवाळू..

मायावी वा दुष्ट अतिरथी ।
तुझिया पुढती कुणिही न टिकती ।
वायुतत्त्ववन्ता ! ...।।२।। ओवाळू..

देई शक्ती, सेवा, शुद्धी ।
नामामध्ये दीना दृढमती ।
तारि कृपावन्ता ! ...।।३।। ओवाळू..

(ट्रॅक नं. १४९)

माणसाच्या जीवनाला पवित्र आणि सुंदर करणाऱ्या – दुर्लभ सद्‌बुद्धी, विमल ज्ञान, अपूर्व संयम, शुद्ध प्रामाणिकता – अशा अनेक सद्‌गुणांचा संगम असलेली श्री गणपती, ही अनेकांची आराध्य देवता आहे. तिच्या उपासनेनं स्वाभाविकच उपासकाच्या आयुष्यात मांगल्य येतं, समृद्धी येते. त्यातही ही देवता त्रिगुणांच्याही पलीकडं राहणारी, उपासकाला तिथं नेणारी तर आहेच, पण ती समूहांचं, गणांचं नेतृत्व करणारीही आहे. तिच्या प्रतीकात्मक गजवदनातून माणसाचं श्रवण म्हणजे ज्ञानाचं अगदी प्रथम आणि अंतिम साधन किती मोठं असावं, मानवी दृष्टीला सहसा न दिसणाऱ्या पण दिसणं गरजेचं असलेल्या परिस्थितीच्या अनेक बाजू पाहाण्याची दृष्टीची विशालता कशी असावी, सतत प्राप्त करीत असलेलं ज्ञान साठवण्याची क्षमता कशी विराट असावी आणि इतकं सारं असूनही आपली वाचा कशी संयमित ठेवावी, हे या आरतीत प्रथम वर्णिलेलं आहे आणि पुढं भक्तांना सध्याच्या दुर्बुद्धीच्या, दुर्जनतेच्या, कलीच्या प्रभावाला तोंड देण्यासाठी ज्या सद्‌गुणांची गरज आहे, ते सद्‌गुण श्री गणपतीनं प्रदान करावे म्हणून प्रार्थनाही केली आहे.

गणपतीची आरती

जय जय आरती, जय गुणगणपति,
मंगलमयचरणा ।। धृ ।।

प्रदीर्घ श्रवणा, विशाल नयना ।
विराट मस्तक, उदंड ज्ञाना ।
अपूर्व संयमना ! ।।१।।

दे सद्‌बुद्धी, शुद्ध भावना ।
प्रामाणिकता देई जीवना ।
दीना कलितरणा ! ।।२।।

(ट्रॅक नं. १४४)

* ३. प्रार्थना *

●खऱ्या किमान उपासनेसाठी प्रार्थना●

(उपासनेचे खरे ध्येय आपली वृत्ती बदलून कर्तव्यमय व भगवंतमय व्हावी, हे आहे. वृत्त्यंतर महत्त्वाचे असले तरी त्याची व्याप्ती खूप मोठी असल्याने त्या कामाचे थोडेथोडे, शक्य होण्यासारखे भाग पाडून ते करू शकल्यास पूर्ण वृत्त्यंतराकडे – म्हणजे खऱ्या उपासनेकडे जाणे शक्य होईल. म्हणून ही किमान वृत्त्यंतराची प्रेरणा आपल्याला देणारी प्रार्थना रोज म्हणणे, तिचे चिंतन व प्रयोग करीत राहाणे साधकांस उपयुक्त ठरेल.)

श्रींचे निरूपण असो अथवा चरित्र ।
सारात सार करणे चित्ता पवित्र ।।
नामात राहुन सदा मन पालटावे ।
वृत्त्यंतरात अवघे परमार्थ यावे ।।१।।

वाटे पवित्रपण हे मजला जमावे ।
या जन्मि साध्य करुनी श्रीरूप व्हावे ।।
कैसे विशालपण परि मजला जमेल ।
सर्वत्र वृत्ति जपणे मज ना जमेल ।।२।।

वृत्त्यंतरात अवघे जरि सार असले ।
या रागलोभअसुये पुढती न चाले ।।
म्हणुनी निदान असता मी साधकांत ।
वृत्तिप्रयोग करणे मज साधुदेत ।।३।।

*

* ४. उपासनामाला *

● १. संतनमनमाला ●

(संतांच्या उपकारांचे स्मरण, संतछायेत स्थापित संतप्रतिमांच्या क्रमाने त्यांचे कार्य, उपदेश इ. चे स्मरण तसेच गुरुपद व अन्य सूक्ष्मरूप संतांचे ऋणस्मरण करण्यासाठी म्हटली जाणारी नमनमाला)

।। सब संतन की जय ।।

नमन माझे विश्वात्मका । तसे गुरुपदप्रतीका ।
नमन माझे भाविका । जे जमती येथ ।।१।।

ही संतमंडळींची दया । राजी जाहले यावया ।
म्हणुनी वसे संतछाया । आनंदे घरी नांदे ।।२।।

संतछायेत प्रवेशता । नमन माझे समस्ता ।
प्रतिमामूर्त संतां । नमन माझे अमूर्तांही ।।३।।

नमन करावे येऊन । संतछायेत दैनंदिन ।
एरवी अनुसंधान । यांचे सतत असावे ।।४।।

प्रारब्धे धरिले देह । आम्हापरी भासती मानव ।
महाभूते आणि जाणीव । एकचि आहे ।।५।।

परि देह धरुनी हाती । संतांनी साधले या किती ।
देवप्रत्यय या जगती । आणिला सर्वांसाठी ।।६।।

असामान्य असती थोर । परि सामान्यांचे प्रेम फार ।
कसा होईल उद्धार । याची तळमळ वाटतसे ।।७।।

ठेवून आपुले दुःख दूर । आम्हांसाठी कष्टती आयुष्यभर ।
घेती अमुचा प्रपंचभार । परमार्थही सांभाळिती ।।८।।
की व्हावा यांचा परमार्थ । एवढाचि त्यांचा स्वार्थ ।
अन्यथा त्यांचा त्यांना अर्थ । एकांतीच असतसे ।।९।।
म्हणून त्यांचे उपकार । स्मरण्या नमन वारंवार ।
उपदेश ठसो चित्तावर । आचरणही घडो निष्ठेने ।।१०।।

नमन समर्था रामदासा । वैराग्यभक्तीच्या महापुरुषा ।
चेतविसी राष्ट्रपुरुषा । रामोपासना बळे ।।११।।
सुमुहूर्ती सावध होऊन । स्वजन स्वसुख त्यागून ।
आत्माराम करुनी प्रसन्न । घेतलासे तपोबळे ।।१२।।
अमुचे प्रपंचदास्य मोडो । आम्हा रामदास्य घडो ।
हनुमंत कुळस्वामी आवडो । इहपर स्वहित साधो ।।१३।।

नमन स्वामी निरंजना । श्री दत्त आणिले सगुणा ।
प्रपंचदेहही लाविला पणा । नमन तया तपासी ।।१४।।
प्रपंच–दुःखाचा अनुभव । घेती सर्वही मानव ।
परी तुमच्यापरी अनुभव । देवाचा कोण घेई ।।१५।।
केल्या अवीट पद्यरचना । केले सुबोध विवरणा ।
त्याच्या वाचनचिंतना । कृपा असावी निरंजना ।।१६।।

नमन श्री माणिकप्रभूंस । श्री दत्तप्रभू वाली जयांस ।
उपासना, निष्ठेने प्रभुपदांस । गाठले आपण साक्षात ।।१७।।
भक्तांस सदैव रक्षिता । दुष्टांसि शासन करिता ।
संकटी धावून येता । आजही आर्तांच्या ।।१८।।
दानधर्म अपार केला । भजनास निर्मिली पद्यमाला ।
भक्तकार्यकल्पद्रुमाला । काही अशक्य असेना ।।१९।।

श्री अक्कलकोट स्वामींस नमन । श्री दत्त,नृसिंहसरस्वती आपण।
कर्दळीवनी नृसिंहभान होऊन । आजानुबाहू प्रगटला ।।२०।।
सिद्धी, भूतभविष्यवर्तमान । स्वामी समर्थांपुढे हात जोडून ।
उभे असताही निरिच्छ राहून । कितीक जना उद्धरिले ।।२१।।
अतर्क्य भाषा, परीक्षा, सत्ता । परि शरणागतासी अभय देता।
रावरंका लीला दाविता । प्रचीती आजही येतसे ।।२२।।

श्री निंबरगी महाराजांस नमन । प्रसिद्ध गुरुलिंगजंगम म्हणून ।
सिद्धगिरी कोल्हापुरचे मुनी मुप्पिन । यांनी गुरुपदेश दिला ।।२३।।
निळाऱ्याचा व्यवसाय सोडुनी । नेमासाठी मेंढपाळी पत्करुनी।
तीन तपे गुप्तपणे नेम करुनी । सिद्धावस्था गाठली ।।२४।।
आचरण हेच खरे बळ । प्रपंचाचा विरक्तीने सांभाळ ।
आत्मप्रचीती सार सकळ । साधो आम्हा ही विनवणी।।२५।।

भक्तिभावे नमन श्री रामकृष्णांस । भूतळीच्या परमहंसास ।
निर्मळ अंतःकरण, सरळ स्वभावास । तसे नमन तपश्चर्येस।।२६।।
कालीमाता सजीव झाली । विकार आसक्ती नाश पावली ।
तंत्र शक्ती वैष्णव साधना झाली । सिद्ध अपुल्यापुढे ।।२७।।
सारदामाता लौकिक पत्नी । घडविली थोर अधिकारी साधनी।
विवेकानंदादि शिष्यांना प्रेरणा देऊनी । युगधर्म प्रवर्तिला ।।२८।।

श्री पंतमहाराजांसी नमन । सद्‌गुरू बाळप्पांनी केले धन्य ।
विसाव्या वर्षी उद्धरून । दत्तभजनी लागला ।।२९।।
प्रपंच, कर्तव्ये, गृहस्थाश्रम । सांभाळिता लाविले प्रेम ।
भक्तमेळ्यांत हाती मर्म । अवधूत मार्गाचे दिले ।।३०।।
उदंड भक्त संप्रदाय । प्रेमलहरी, पदे अनुपमेय ।
दत्तभक्ती चिंतन–पाथेय । अपूर्व दिधले आम्हा ।।३१।।

शेगावीचे देववैभव । श्री गजानन महाराज दिव्य ।
निःस्पृह, निष्काम मूर्ती भव्य । नमन त्यांसी आदरे ।।३२।।
जन्मकुळग्राम टाकुनी । थेट उद्धारकार्यास लागुनी ।
अकारण वर्णकुळाभिमानी । जनांस धडा दिला ।।३३।।
पाणी, अन्न यांची महती । उपदेशिली समता, भक्ती ।
गजाननविजय वाचिता मुक्ती । तशी कृपा आजही लाभतसे ॥३४॥

श्री बीडकर महाराजांसी नमन । रामानंद नामे धन्य ।
प्रपंच परमार्थी अनन्य । पराक्रममूर्ती आपण ।।३५।।
श्री अक्कलकोट स्वामी प्रसन्न । घेतले आपण करून ।
पुढे मौलिक उद् बोधन । शिष्यहितासाठी केले ।।३६।।
परमार्थात नसे प्रारब्ध । सर्वत्र आपुला प्रयत्नवाद ।
आम्हा साधकांस आशीर्वाद। आपुला असावा संतवर्या।।३७।।

श्री वासुदेवानंद सरस्वतीस नमन । त्रिखंड कीर्ती टेंब्येस्वामी म्हणून ।
असंख्य शास्त्र–विद्यांचे अध्ययन । उदंड शिष्य उद्धरिले ।।३८।।
माणगाव पूर्वजीवने धन्य । चातुर्मास्यांनी अनेक ग्रामे पावन ।
गरुडेश्वरी समाधी घेऊन । तीर्थक्षेत्र तया केले ।।३९।।
साक्षात देवांशी संवाद साधिला । आज्ञेने कठोर तप जगला ।
विपुल ग्रंथ, मंत्र प्रसाद दिधला । आम्हा साधकांना उद्धरावया ।।४०।।

श्री जे. कृष्णमूर्तीस नमन । भाव असता नमन प्रयोजन ।
सात्त्विक क्रियांतही सावधान । नित्य केले आम्हा ।।४१।।
आपुले दु:ख बंध जाणावे । स्वत:च स्वहित शोधावे,साधावे ।
मुक्त स्वत:स करावे । तेच साह्य इतरांस ।।४२।।
जेथे प्रश्न तेथे उत्तर । नसे इतर कुणी जबाबदार ।
प्रकाश टाकिला जो अवघ्यावर। उपयुक्त असे आम्हांस ।।४३।।

नमन श्री ज्ञानराज माउली । संतांनाही वाटे सावली ।
भक्तांवरी सदेह कृपा झाली । कृष्णपरमात्म्याची ।।४४।।
भक्तिमार्ग सोपा केला । भगवंत सर्वांचा झाला ।
अनुपम सुबोध सजवून दिला । गीतार्थ मराठियांना ।।४५।।
ओवी ओवी अमृतानुभव । शांत करी अगणित जीव ।
कैवल्याचा द्यावा अनुभव । संतछायेत सर्वांना ।।४६।।

नमन जगद्गुरू श्री तुकोबा । अनुभवांचा अलौकिक गाभा ।
गाथेची पसरली प्रभा । आज अवघ्या जगावरी ।।४७।।
पाखंड तोडून टाकिले । प्रेमळ भक्त प्रतिष्ठिले ।
कठोर साधन उपदेशिले । अनुभवशुद्ध वचनी ।।४८।।
विचार करण्या लाविले । भावे आकाशाएवढे केले ।
विठ्ठलाचे प्रेम वाढविले । ते आम्हा लाभो ।।४९।।

नमन श्री रमण महर्षींस । विरक्त मौनी साधूस ।
बाळपणी तपश्चर्येने स्वरूपास । साधले आपण ।।५०।।
खऱ्या मीचा करावा शोध । घेता तयाचा पूर्ण वेध ।
दु:खचिंतेचा संपतो संबंध । निरुपाधिक मार्ग आपुला ।।५१।।
आपुले हास्य निर्मळ । नि:शब्द संवाद प्रबळ ।
शुद्ध साधनविचारास बळ । सदैव आम्हा देतसे ।।५२।।

श्री भाऊसाहेबांस नमन । उमदी ग्राम केले धन्य ।
निंबरगी महाराजांस अनन्य । शिष्य आपण झाला ।।५३।।
भक्तीचा घालून दिला धडा । दासबोधाचा केला उलगडा ।
नेम, सप्ताह भरूनी घडा । वाहविले सर्वत्र ।।५४।।
शिष्योत्तम अंबुराव । आणि घडविले गुरुदेव ।
प्रयत्न आणि खरा देव । उपदेशिला अज्ञ जना ।।५५।।

नमन श्री कृष्णदासांस । समर्थांनी देता दृष्टांतास ।
पाणके होऊन सेवेस । सज्जनगडी शरीर झिजविले ।।५६।।
माहुलीच्या घाटावर । तपाचरण केले थोर ।
बालकांचे प्रेम फार । शिकविले किती तयांना ।।५७।।
अभ्यासे अध्यात्मकथन । प्रेमळ पदांचे लेखन ।
अल्पवयी समाधीगमन । अद्‌भुत वाटे आम्हाला ।।५८।।

नमन श्री साईबाबांस । धर्मपंथातीत महापुरुषास ।
भूवैकुंठ केले शिर्डीस । अतर्क्यपणे प्रकटुनी ।।५९।।
माणुसकीचा धर्म वाढविला । रामरहीम एक केला ।
श्रद्धा, सबुरी, परोपकार शिकविला । हितासाठी सर्वांना ।।६०।।
अतर्क्य लीला, ईशसत्ता । आपुल्यारूपे अनुभविता ।
दुजेप्रमाण नको आता । पावन आम्हांसी करावे ।।६१।।

श्री अरविंदांसी नमन । अद्‌भुत आपुले दर्शन ।
उपदेशिले दिव्य जीवन । आजीवन जगूनिया ।।६२।।
उच्च आंग्लविद्याविभूषित । क्रांतिकारकांचे दैवत ।
त्यागाने आयुष्य समस्त । तळपते आपुले ।।६३।।
सावित्रीसम महाकाव्य । असंख्य ग्रंथ पाथेय दिव्य ।
माताजीकृपे आश्रम भव्य । आम्हा प्रेरणा देतसे ।।६४।।

श्री बाबा महाराजांसि नमन । नमनभक्तीसही नमन ।
आत्मरूपी अखंड ध्यान । जपले आपण ।।६५।।
लौकिक अभियंते झाला । वरिष्ठांसि आदरपात्र जाहला ।
सद्‌गुरूंसी आवडते झाला । साधननिष्ठेने ।।६६।।
पिसेपणे आत्मानुभव झाकला । देता खूण ज्याची त्याला ।
बोट धरुनी आम्हाला । देवमार्गी न्यावे ।।६७।।

नमन श्री गुरुदेवांसी । कट्टर करुनी साधनासी ।
मांडिले साक्षात्कारशास्त्रासी । जिज्ञासू जनांसाठी ।।६८।
परमार्थपाणिनी आपण । पौर्वात्य पाश्चिमात्य ज्ञान ।
वैराग्य गुरुप्रेम धन्य । भक्तिप्रयाग झाला ।।६९।।
प्रकृतीची नसता साथ । वर्षानुवर्षे केले साधनव्रत ।
आपुल्या कृपे लाभो साथ । तशा निष्ठेची आम्हा ।।७०।।

पूर्ण प्रेमादरे साष्टांग नमन । श्री केतकर महाराज धन्य ।
तात्या, आपुल्या इतुके अनन्य । क्वचित कुणी जाहले ।।७१।।
निष्ठेचा अपूर्व वारसा । स्वतःस विसरण्याचा आपुला वसा ।
मीचा पुसुनी गेला ठसा । अशक्य शक्य झाले श्रीकृपे ।।७२।।
मग आत्मज्ञान प्रगटले । ब्रह्मासी तादात्म्य झाले ।
कोणा कळे, कोणा न कळे । कारण तदाकार श्रीराम ।।७३।।

नमन श्री मामांना । धन्य दांडेकर कुलोत्पन्ना ।
जोगबुवांच्या शिष्यांत गणना । अग्रभागी आपुली ।।७४।।
लौकिक विद्यासंपन्न । अमोलिक केले अध्यापन ।
ब्रह्मचारी वर्गास भूषण । प्राचार्यही झाला ।।७५।।
ज्ञानेश्वरी सार्थ केली । प्रत्यक्ष जगून सांगितली ।
वारकरी परंपरा सांभाळिली । सत्कार्य वाटे प्रेरक ।।७६।।

नमन साध्वी अंबिकाबाईंस । केला नारिंग्रे ग्रामी वास ।
राणेस्थापित श्रीरामसेवेस । जीवन अखंड वाहिले ।।७७।।
अकाली पतिछत्र हरपले । पंढरिरायाने रामछत्र दिले ।
उपवासी शरीर कष्टविले । कर्तव्य तसे देवकार्यी ।।७८।।
आपुली गोसेवा धन्य धन्य । व्रतस्थता, रामनिष्ठा अनन्य ।
आशीर्वादे होवो राम प्रसन्न । आपुल्यापरी आम्हा ।।७९।।

नमन श्री स्वामी स्वरूपानंदांस । त्यागी, समाजसेवक, देशभक्तास ।
शांती, सद्‌गुरुनिष्ठा, साधनास । नमन कृतार्थतेस आपुल्या ॥८०॥
उत्कृष्ट बुद्धिमत्ता, अंतर्मुखता । आजाराच्या करुनी निमित्ता ।
प्रपंचादि कार्यांतून वळविता । झाला भगवंत कृपाळू ॥८१॥
प्रकृती क्षीण अकाली । सोऽहम् ध्यानी उपयोगा आली ।
जीवन्मुक्ती, जगदोद्धार साधून गेली । स्मरण राहो आम्हांस ॥८२॥

श्री गणोरेबाबांना नमन । देशासाठी स्वसुख सोडून ।
त्यागी गणोरे म्हणून । सार्थ प्रसिद्धी पावला ॥८३॥
पुढे सांभाळिली निरपेक्षता । प्रपंच कर्तव्य करिता ।
साथ सीतामाईंची असता । साधन थोर केले ॥८४॥
देही असता देव गाठिला । मार्ग अनेका दाखविला ।
प्रेम कर्तव्य नामाला । आपुला मठही प्रेरक ॥८५॥

श्री कलावती आईंस नमन । नमिला हरिहर तसा गोपाळकृष्ण ।
सफळ केले सिद्धारूढस्वामींचे शिष्यपण । खडतर साधन करुनी ॥८६॥
सोसले, पारखिले प्रपंची जन । न देता कोणासि दूषण ।
हरिनाम कीर्तन साधन । प्रतिकूलतेत टिकविले ॥८७॥
बालोपासना, भजनप्रेम । रुजविले आबालवृद्धांत नाम ।
आपुल्या हरिमंदिरीचे प्रेम । आजही लाभे घरोघरी ॥८८॥

नमन श्री विश्वनाथबाबांना । डव्हे गावी मजुरी करताना ।
प्रिय झाला नाथनंगेबाबांना । शिष्य म्हणुनी आपण ।।८९।।
त्यांनी दिलेले कठोर साधन । चाकातीर्थी केले आचरण ।
साक्षात्कारे अवघे जीवन । पावन धन्य झाले ।।९०।।
अंतर्बाह्य शुद्धतेचा संदेश । आपण दिला साधकांस ।
गुरुनाम गाथा आम्हांस । आचरण्या बळ द्यावे ।।९१।।

नमन श्री निसर्गदत्तांस । मायापुरी मुंबईत वास ।
प्रारब्धे प्रयत्ने सहवास । सिद्धरामेश्वरांचा घडला ।।९२।।
त्यांनी दिली ओळखण । स्वरूप हेचि आपण ।
श्रद्धेने तीन वर्षे आचरण । अखंड आपण केले ।।९३।।
गाठली तेव्हा स्वरूपस्थिती । मग साक्षित्वे वावरला जगती ।
सुखसंवाद दिधला हाती । आम्हा साधकांच्या ।।९४।।

नमन श्री विनोबांस । अलौकिक प्रज्ञापुरुषास ।
अविश्रांत लोकसेवेस । नमन आपुल्या ।।९५।।
तसे नमन ब्रह्माचरणास । असंख्य भाषाविद्याकोविदास ।
अवघ्या धर्मांचा अभ्यास । अपूर्व गाढा आपुला ।।९६।।
गीताई असो वा भूदान । तेथे प्रज्ञा हृदय मीलन ।
तपश्चर्येचे आजन्म वळण । आम्हा साधकांना मिळो ।।९७।।

नमन श्री नाना महाराजांस । बालपणी घेतले अनुग्रहास ।
टेंबे स्वामींच्या कृपेस । पात्र आपण झाला ।।९८।।
तराणे ग्राम धन्य केले । कठोर तप आचरले ।
अनेक शास्त्रांचे मिळविले । प्रभुत्व आपण ।।९९।।
परी शिष्यांसाठी प्रेममूर्ती । आपण सांभाळिता जगती ।
साधनेस आम्हा गती । कृपा करून द्यावी ।।१००।।

श्री स्वामी वरदानंदांसी नमन । अद्‌भुत बाल्य, विलक्षण जीवन।
सद्‌गुरुनिष्ठा, समाधी निर्वाण । अतुलनीय कलियुगी ।।१०१।।
श्री साईबाबा, श्री दासगणू । कुणी घडविली मूर्ती म्हणू ।
व्यासंग, कीर्तन, वैद्यक वर्णू । कुण्या शब्दांत काय काय ।।१०२।।
अश्रद्ध, दुराचाऱ्यांवरी प्रहार । सदाचारी सज्जनां मदतीस तत्पर ।
भाविकां, साधकां आधार । अप्पा, आपुला वाटे आजही ।।१०३।।

श्री ब्रह्मानंदांसी नमन । भजनाचे मूर्तिमंत साधन ।
भजनावलीरूपे आपण । अमर झाला ।।१०४।।
पुष्करतीर्थी लौकिक समाधी । प्रेरक परी साधी ।
उपदेशिली टाकण्या उपाधी । शुद्ध साधन करावे ।।१०५।।
हिंदी पदे रसाळ विपुल । मांडिती सिद्धांत विमल ।
साधन त्यांतील सकल । प्रेमे घडो आम्हां ।।१०६।।

आणि दयासिंधु गुरुमाउली । ब्रह्मचैतन्यरूपे साकारली ।
गोंदवल्यास मूर्त झाली । नमन त्रिवार तियेला ।।१०७।।
अनुसंधान अखंड राखावे । नामस्मरणे जीवन भरावे ।
भगवंतस्मरणात करावे । कर्तव्य आपुले ।।१०८।।
अतिथी गरजूंस अन्नदान । वृत्त्यंतरी दक्ष राहून ।
निर्व्याज प्रेम आपल्यापासून । शिकावेसे वाटे ।।१०९।।

जगजनाच्या उद्धाराची चिंता । जगदीशासि सदैव असता ।
निर्मिली असे गुरुपदव्यवस्था । विश्रामध्ये अवघ्या ।।११०।।
ती न जाणे धर्मपंथ । भेदभाव मानवनिर्मित ।
उद्धारप्रयत्नांत मदत । कोणासही करीतसे ।।१११।।
साह्य मागता आर्त होऊन । आकारा आणिते संत सज्जन ।
यास्तव कृतज्ञतेने करू नमन । गुरुपदप्रतीकास ।।११२।।

आणि तयां सर्वांना नमन । जे प्रतिमारूपे नसून ।
सूक्ष्म रूप धारण करून । असंख्य संत येथे ।।११३।।
सत्कार्याचे कौतुक धरून । पदावलीचे प्रेम वाटून ।
साधकांचे पाहून अंत:करण । रमले संत येथे ।।११४।।
त्यांनी सुखेनैव आनंदे रहावे । साधकांवरी कृपाछत्र धरावे ।
जीव उत्तम गतीस न्यावे । येथील अवघे ही विनवणी ।।११५।।

।। श्री सद्‌गुरुनाथ महाराज की जय ।।
।। सब संतन की जय ।।

● २. नामनिवेदनमाला ●

(कोणत्याही वैयक्तिक किंवा सामूहिक जपसांगताप्रसंगी म्हणण्यासाठी)

मंगलमूर्ती मोरया । बुद्धिदायका सदया ।
नामनिवेदन निर्विघ्न कराया । यावे विघ्नेश्वरा गणराया ।।१।।

अव्यक्त गुरुपदासि वंदन । व्यक्त सद्‌गुरूंचे स्मरण ।
संतसत्पुरुषांचे चरण । भक्तिभावे नमिले ।।२।।

स्थूलसूक्ष्मादि देव । थोर भक्तांचे समुदाव ।
विशेष धरिला आदरभाव । अपुल्या अपुल्या गुरुपायी।।३।।

कठीण काळाचे गणित । उभा देहबुद्धीचा पर्वत ।
उल्लंघोनि आम्हा दिसत । दिवस आज भाग्याचा ।।४।।

जे जे नाम घडले । ते अत्यादरे आणिले ।
सांगता प्रसंगी ठेविले । कृतज्ञतेने तव पाया ।।५।।

नाम घडणे ही कृपा साकार । त्यात सत्संगाचा आधार ।
सात्त्विक व्यक्तिगत निर्धार । विशेष वाटे मनाला ।।६।।

अल्पबुद्धीने नाम घडले । असो सदोषनिर्दोष भले ।
ते नाम आजि निवेदिले । प्रेमादरे भगवंता ।।७।।

राहुनी कर्तव्यी तत्पर । नाम स्मरू निरंतर ।
नामधर्म हा आचार। आम्हा ठायी सदा वसो ।।८।।

अधिकउण्यासी क्षमा करणे । अखंड नामप्रेमा देणे ।
नवे संकल्प तडीस नेणे । इतुके मागणे भगवंता ।।९।।

।। श्री सद्‌गुरुनाथ महाराज की जय ।।

* ५. नित्यपाठ *

● १. एकाध्यायी विचारगीता ●

आहे शुद्ध विचाराचे, स्थान मोठे जगात या ।
ज्ञानाचे, बुद्धिचे काम, वाढले शतकात या ।।१।।
विचारे सार शोधावे, ज्याने त्याने स्वतंत्रसे ।
अल्पबुद्धी इथे आहे, थोड्के दिधले असे ।।२।।
देहाचे जाणुनी मोल, द्यावे स्थान तया खरे ।
निसर्गाच्या क्रमे त्याचे, योग्य ते करणे बरे ।।३।।
चैनीत ठेवणे नाही, त्याची आबाळही नसो ।
आजन्म कष्ट करण्याची, शक्ती त्यात सदा वसो ।।४।।
कष्टाने मिळविणे पैसा, दाने शुद्ध सदा घडो ।
चालेना त्याविना तरिही, कोणी लोभात ना पडो ।।५।।
एक वेळ कमी चाले, अती क्षोभास कारण ।
विनाकष्ट, अती जेथे, दु:खी होईल जीवन ।।६।।
स्वजनांच्या दक्ष कर्तव्यी, गुंतणे तेथ ना जरी ।
गरजा, स्वार्थ जाणूनी, वर्तणे नित्य अंतरी ।।७।।
सुखाला सर्व नात्याचे, जोडिती नसले तरी ।
नसे नाते कधी दु:खा, पोरके जगते घरी ।।८।।
प्रारब्धाचा जमे मेळा, एक त्यातील आपण ।
हीच अंतिम ठरे भेट, जरी सावध जीवन ।।९।।
प्रपंच फाटका आहे, राजा रंक कुणी जरी ।
बाहेर दिसते त्याला, भुलणे कधि न अंतरी ।।१०।।

अपुरा आतुनी असतो, रंगढंग वरी जरी ।
दोष ना त्यात कोणाचा, पण जाणून हे करी ।।११।।

स्वावलंबी हरेकाने, व्हावे शक्य तिथे, तसे ।
होते साह्य तया योगे, ज्यांना ते जमले नसे ।।१२।।

अहंकार नसो ज्याला, जमले स्वावलंबन ।
कृपा त्यात असे जाणा, नसे स्वाधीन तनमन ।।१३।।

संस्था, सृष्टि, समूहांचे, आजन्म ऋण मानवा ।
फेडणे ते पुढे आहे, एक कर्तव्य या जिवा ।।१४।।

कर्माचे दास ना व्हावे, कर्मे नित्य जरी करी ।
ध्येयास युक्त ती घ्यावी, बाकीची टाळणे बरी ।।१५।।

कौशल्य निवडीमध्ये, कर्मे करण्यातही असे ।
साधते ज्यास तो थोर, अंती मुक्त सदा असे ।।१६।।

शब्द, सूर तशा रेषा, कला माणूस घडविती ।
अंतरंगे मनुष्यांची, समृद्ध करिती किती ।।१७।।

अकृत्रिम कलाविश्व, सृष्टीमध्ये वसे खरे ।
निरहंकार कसे कर्ते, तेथे ते शिकणे बरे ।।१८।।

घडण्या कार्य कुठलेही, होण्या सुकर जीवन ।
व्यवस्था लागते तेथे, थोडे नियमपालन ।।१९।।

वेष वा देश वा न्याय, कुटुंबे, कर्म, धर्म वा ।
व्यवस्था मानवी साऱ्या, स्मरणे नित्य मानवा ।।२०।।

म्हणुनी दोष व्यवस्थांत, कोणी, कोठे करो किती ।
निर्जीव कायदे–शब्द, चैतन्यास न बांधती ।।२१।।

निर्व्यवस्था नसे मार्ग, करावे दोषशोधन ।
व्यक्तिचे स्वास्थ्य, स्वातंत्र्य, गाठणे ध्येय पावन ।।२२।।

परंपरा परीक्षूनी, घ्यावी निवडूनि आदरे ।
त्याज्य ते टाकिता धैर्ये, मनी भीती नको बरे ।।२३।।

ध्येयाची वर्तनी गाठ, घालता हो परंपरा ।
काळ–प्रश्न नवे येता, शोधणे नव उत्तरा ।।२४।।

शस्त्रे, रसायने, शास्त्रे, औषधे, परमाणु वा ।
वाढती सुखविज्ञाने, झेप ही दिव्य मानवा ।।२५।।

परी होता तसा आहे, कर्ता मानव आदिम ।
स्वार्थ, दंभ, विकाराला, कोठे उत्तर उत्तम ।।२६।।

खरी स्पर्धा स्वत:शीच, बाकी दु:खास कारण ।
समाधान खरी प्रगती, बाकीचे ढीग दारुण ।।२७।।

येथले येथ ठेवावे, लागते सर्वही धन ।
घरेदारे असो सत्ता, मृत्यूने पारखे जन ।।२८।।

मिळविता, टिकविता सर्व, याचे भान सदा असो ।
अंति जो येत सांगाती, त्याचे नाम मुखी वसो ।।२९।।

त्यासाठी वेळ काढावा, व्यवसाय कुठला असो ।
अज्ञ वा सुज्ञ वा कोणी, सानाथोर कसा असो ।।३०।।

कर्त्याला कर्मस्वातंत्र्य, लाभले देव जाणण्या ।
सत्संग नित्य साधावा, आत्मारामास भेटण्या ।।३१।।

सद्‌गुरू, साधनी व्यक्ती, सेवावे आप्त ते खरे ।
मुक्तिचे तेच सांगाती, नित्याने भेटणे बरे ।।३२।।

शाश्वतात समाधान, देव सर्वांस नित्य तो ।
अंतरी असता त्याला, जो तो सर्वत्र शोधितो ।।३३।।

अशाश्वत पहा सारे, बदले विश्वव्यक्तिही ।
दु:ख अस्वास्थ्य हिंदोळे, देते सर्वांस प्रत्यही ।।३४।।

जरी बदलतो देह, नित्य चैतन्य यातिल ।
आजन्म चालतो श्वास, ती त्याची खूण येथिल ।।३५।।

देवास शोधितो जगती, श्वासाची जाण ना असे ।
मिळते का कुठे काही, जेथे जे ठेविले नसे ।।३६।।

देहात चालतो श्वास, काही ना करि सर्वथा ।
आजन्म कर्मव्यापार, चाले का तरि अन्यथा ।।३७।।

तसा विश्वातला श्वास, पाही शोधून कोणता ।
विश्वव्यापार तसा कर्ता, थकते बुद्धि शोधता ।।३८।।

वाटते जगती ज्याला, समाधान खरे हवे ।
त्याने उत्तर कोठेही, शोधुनी पाहणे नवे ।।३९।।

शुद्ध बुद्धी असे तेथे, अणूहि हितकारक ।
अंतरे नसता थोर, ठरते सर्व मारक ।।४०।।

सेवा, प्रेम तसे सत्य, शुद्ध आचार अन् मन ।
हेही देव, भजे त्याचे, होते सार्थक जीवन ।।४१।।

विवेक देव वाटोत, कोणा सगुण निर्गुण ।
अंतरा पालटी देव, त्याच देवा खरेपण ।।४२।।

एक अध्याय गीता ही, विचारे मननी ठसो ।
वाचितो आचरी जो जो, दीनाचे नमन त्या असो ।।४३।।

❊

● २. गुरुतत्त्वतरंगिणी ●

❊अध्याय : पहिला ❊
जागतरंग

उद्धारास मनुष्याच्या, गुरुतत्त्वास ठेविले ।
तरंगिणीत ते जाणू, करू कर्तव्य आपुले ।।१।।

सामान्य जगणे आज, उठणे, श्रमणे तसे ।
जेवणे, झोपुनी जाणे, एवढे उरले असे ।।२।।

कोठे रंजन थोडेसे, थोडे कार्य उदात्तसे ।
परी ते जपुनी स्वार्थ, लोभतृष्णा मनी वसे ।।३।।

ज्ञान वा वित्त वा अन्न, कोणी दान करीतसे ।
हौस, हव्यास नावाचा, प्रसिद्धी त्यातही दिसे।।४।।

सेवा, शास्त्रे, कला तैसे, सारे पैशास जोडले ।
शिक्षणे, मंदिरे, देव, त्यात व्यापार चालले ।।५।।

स्वशब्दाचे नसे मूल्य, मूल्यांचे मूल्य ना उरे ।
सत्ता, पैसा तसा स्वार्थ, साधता सर्वही फिरे ।।६।।

त्रिकाळ रोज कोणीही, करिती मार्गदर्शन ।
त्यास ना लागते ज्ञान, वा प्रयोगमय जीवन ।।७।।

प्रश्न ना सुटले ज्यांचे, स्वत:च्या जीवनातले ।
जाती ते सोडविण्या प्रश्न, लोकांच्या जीवनातले ।।८।।

अंतर्यामी सुसंवाद, असता जगि येतसे ।
येईल का समूहात, जे त्याच्या घटकीं नसे ।।९।।

निष्प्रेम जो घरामध्ये, व्यवसायात वा असे ।
स्वसुखी दक्ष राहून, अंती दुःखी सदा असे ।।१०।।

पळणे, विसरण्या दुःख, रंजने, व्यसने तशी ।
नैराश्ये–मृत्यु–परपीडा, मानवी हीनता अशी ।।११।।

जो तो वापरतो दुसऱ्या, वाढे वापर–संस्कृती ।
पक्ष वा मठ वा देश, वापरास नसे मिती ।।१२।।

देहसौख्य तसे स्वार्थ, हेच आधार जाहले ।
त्याने अशांतता, भीती, यांनी जगतास व्यापिले ।।१३।।

सावधान जरी कोणी, होई या क्षुद्र जीवनी ।
निकृष्टता कळे त्यास, फोलता जाणवे मनी ।।१४।।

तेच ते जगणे सारे, दंभ–खोटे निरंतर ।
भेटतो कोणिही कोठे, जो तो स्वार्थास तत्पर ।।१५।।

जे जे दिसे, घडे ते ते, खरे मानी जसे तसे ।
समजे पूर्ण स्वत:ला तो, कृती तैशा करीतसे ।।१६।।

सद्‌गुरू ओळखी ना तो, इतरां तुच्छ मानितो ।
भ्रमाचे हे जिणे सारे, जागतो तोचि जाणतो ।।१७।।

खरेखोटे कळे जेव्हा, पूर्णापूर्ण कळे तसे ।
त्याला सद्‌गुरुचे कार्य, कळणे सुरु होतसे ।।१८।।

होतसे जीवनारंभ, माणसाचा खरा तिथे ।
नि:स्वार्थ–प्रेम–सत्याचा, शोध होतो सुरू जिथे ।।१९।।

कोठे ते शिकणे सारे, त्याचे उत्तर 'सद्‌गुरू' ।
ती असो व्यक्ति वा ग्रंथ, वा ते स्फुरण अंतरी ।।२०।।

जागणे हाचि आरंभ, गुरुमार्गावरी ठरे ।
गुरुकृपे घडो सर्वां, हेचि दीना मनी उरे ।।२१।।

जागतरंग नाम पहिला अध्याय समाप्त ।
श्रीसद्‌गुरुचरणार्पणमस्तु ।

* अध्याय : दुसरा *
पूर्णताशोधतरंग

श्रीमंत जगतामध्ये, असो कोणी गरीबही ।
निरोगीरोगि वा दुर्बळ, सत्तावान, सशक्तही ।।१।।

नसो वा असु दे काही, केवढेही कुणाकडे ।
त्यांच्यापाशी असे नक्की, एक जे त्यांस आवडे ।।२।।

'मीपणा' एक सर्वांत, आहे भरुन राहिला ।
नकळो वा कळो कोणा, जीव प्रत्येक ग्रासला ।।३।।

निर्धनास जसा आहे, तसा धनिकासही असे ।
असो विद्या, नसो विद्या, मीपणा ठेविला असे ।।४।।

रूपाने श्रेष्ठ कित्येक, कुरूप जगि जाहले ।
दोघेही जपती 'मी'स, कुणी ना 'मी'स सोडले ।।५।।

मीपणा वा अहंभाव, प्रिय जीवांस वाटतो ।
पूर्णत्वाला परी जाण्या, तोच जीवांस अडवितो ।।६।।

रूपे घेउन तो नाना, व्यवहारात आढळे ।
निर्मितो दु:ख अपुल्यात, तरि थोडाहि ना ढळे ।।७।।

करी माझेतुझे नित्य, त्यांत मी श्रेष्ठ वेगळा ।
होवो अपयशी, दु:खी, तरी आदर्श मी भला ।।८।।

असो क्षेत्र कुटुंबाचे, धंदा वा नोकरी असो ।
क्षेत्र अध्यात्म वा शास्त्र, कला, काव्य कसे असो ।।९।।

वेगळेपण जपण्याची, इच्छा जीवात निर्मितो ।
सर्वत्र स्वतंत्र अस्तित्व, ठेवण्या भाग पाडितो ।।१०।।

प्रत्येक माणसाइतुके, किंवा श्रेष्ठ, गुणी, यशी ।
तसे अपयशी असती, दु:खे मोठी जगी जशी ।।११।।

त्यांतला एक मी आहे, हे सत्य असते खरे ।
परी मानी पहा जो तो, माझे दुसऱ्यापरी नसे ।।१२।।

वास्तवात अपूर्णाचे, नसे का तेच लक्षण ।
शक्तीबुद्धी असो काही, राहणे हेचि जाणुन ।।१३।।

जाणणे, शोधणे पूर्ण, जगामध्ये कुठे असे ।
त्यासाठी नम्रता उत्तर, व्हावे शरण हे असे ।।१४।।

सर्वदा शिकण्याजोगे, इतरांत जगी वसे ।
गुरुतत्त्वाचे कुणालाही, तेथ दर्शन होतसे ।।१५।।

दुबळे बाळ कसे असते, ठेविले दुपट्यावरी ।
शरण ते जात आईस, गरजा ती पुऱ्या करी ।।१६।।

माणूस दुबळा असतो, गरजा बदलती जरी ।
अपूर्णता जगामध्ये, जोवरी साथ त्या करी ।।१७।।

स्वावलंबी जरी होतो, वाढे वय जसे तसा ।
परंतु ना कधी पूर्ण, अपुरा तो असे तसा ।।१८।।

एक विद्या जमे त्यास, जाणी कित्येक ना कधी ।
नसे सत्ता, कधी पैसा, प्रकृती, माणसे कधी ।।१९।।

रेषा नेल्या किती दूर, मूळ कोन तसा असे ।
व्यापिले वाटते विश्व, राहाती अंश ते तसे ।।२०।।

जाणणे हे अपूर्णत्व, मानवी जीवनातले ।
ओळखी जो लघुत्वास, त्याचे कल्याण जाहले ।।२१।।

लघुत्व जाणण्यामधुनी, सध्याच्या क्षुद्र जीवनी ।
पूर्णाची लागते ओढ, देई का ते कुणा कुणी ।।२२।।

भगवंत असे सदा पूर्ण, दाखवी सद्‌गुरू भला ।
गुरुतत्त्व पहा सिद्ध, दाविण्या मार्ग तेथला ।।२३।।

असंख्यात गुरू असती, विद्या जे देत मानवा ।
ज्ञान, पैसा तसे स्थैर्य, मिळते त्यांतून या जिवां ।।२४।।

अपूर्ण परी तसे दाते, देती ते पूर्ण ना असे ।
त्यातून साधते तेही, अपूर्ण राहते तसे ।।२५।।

अपूर्णता जिथे आहे, तिथे शांती कधी नसे ।
समाधान तिथे नसते, मात्र पूर्णात ते वसे ।।२६।।

पिता, माता तसे ज्येष्ठ, विद्यागुरु असंख्यही ।
गुरुतत्त्व असे थोडे, त्यांच्या रूपात व्यक्तही ।।२७।।

शोधणे गुरुतत्त्वास, पूर्ण कोठे कसे असे ।
तसे शांतिसमाधान, का मनी अपुल्या नसे ।।२८।।

शोधण्या जात कोणी जो, त्याला मदत होतसे ।
मार्गही मिळतो त्यास, बोधही त्यास होतसे ।।२९।।

पूर्णताशोध नावाचा, द्वितीयाध्याय संपला ।
जागला दीन जो प्रथमी, आता शोधास लागला ।।३०।।

पूर्णताशोधतरंग नाम दुसरा अध्याय समाप्त ।
श्रीसद्‌गुरुचरणार्पणमस्तु ।

* अध्याय : तिसरा *

सद्‌गुरुकार्यतरंग

जागतो जाणतो जीवन, तशी त्याची अपूर्णता ।
जाणो, जगो अभिप्राय, तरंगी तत्त्व शोधता ।।१।।

अपूर्ण मानवी जीवन, कर्ता कर्म अपूर्णसे ।
त्याला लाभे कसे पूर्ण, तो कैसा पूर्ण होतसे ।।२।।

चालतो जगतामध्ये, मेळ अदृश्यदृश्य हा ।
अव्यक्त होतसे व्यक्त, आकारा येउनी पहा ।।३।।

झाडेपेडे, घरे, वस्तू, कित्येक जगतात या ।
माणूस हाहि आकार, दिव्य शक्ती दिल्या जया ।।४।।

परी ना ओळखी, जाणे, काय झेप तयाकडे ।
अदृश्य गाठणे शक्य, क्षुद्र दृश्य तयापुढे ।।५।।

आगळा अंतरी होय, जाणीना सहसा तसे ।
पूर्णास जाणणे शक्य, होणे पूर्ण तया असे ।।६।।

दृश्यास मानुनी सत्य, जो तो आयुष्य चालवी ।
परी मोडे घडे ते ते, जे जे आकार व्यक्तवी ।।७।।

जसा माणूस हा दृश्य, आकारे वेगळा असे ।
वेगळेपण त्या वाटे, जपावे ते स्वतंत्रसे ।।८।।

बोलता, चालता, जग ता, वेगळा मी असेन ना ।
मते, कार्ये, घरे, वस्तू, माझ्या असतील भिन्न ना ।।९।।

चिंतेने या सदा ग्रासे, कृती तैशा करीतसे ।
यातील भ्रम जाणीना, वृद्धत्वा जरि येतसे ।।१०।।

आकारे वेगळा होतो, प्रारब्धे जरि मानव ।
अंतरी तो असे एक, जोडली सर्व जाणिव ।।११।।

दृश्यातही दिसे भिन्न, जरी प्रत्येक आकृती ।
त्यांतही साम्यता मोठी, देते सर्वांस प्रकृती ।।१२।।

मानवे निर्मिले सारे, भाषासंस्कार भेद हे ।
त्याने तो वेगळा भासे, भेद ना मूळ येथ हे ।।१३।।

वेगळेपण सौख्याचे, वाटे सर्वांस ते जरी ।
व्यवहारार्थ ते लागे, तेवढे कार्य ते करी ।।१४।।

बसणे जपत ते पुढती, सुखाचा भ्रम तो असे ।
म्हणुनी देतसे दु:खा, जो जो जपत त्या असे ।।१५।।

साधर्म्य अंतरी असते, एक निर्जीव जीवही ।
शोधता ते कळे सर्वां, अनुभवा येत प्रत्यही ।।१६।।

बोधण्या ते मना सारे, शोधण्या बळ लागते ।
सद्‌गुरू आगळी शक्ती, मुक्तिमार्गास दाविते ।।१७।।

वेगळेपण बंधाचे, एकत्वी मुक्ति होतसे ।
प्रामाणिक असे त्याला, विचारे बोध होतसे ।।१८।।

परी अनुभवा येण्या, तैसे सारे स्थिरावण्या ।
लागती सद्‌गुरू तेथे, ऐसे अद्वैत जाणण्या ।।१९।।

जमते कार्य कुठलेही, स्वप्रयत्ने कुणासही ।
परंतु पाहणे दुष्कर, अहंकारास प्रत्यही ।।२०।।

अणुरेणूहुनी सूक्ष्म, मीपणा हा किती असे ।
सद्‌गुरू लागती त्यास, जाणण्या, जाळण्या तसे ।।२१।।

उद्धारास व्यवस्था ही, भगवंताची कृपा असे ।
गुरुतत्त्व निराकार, सद्‌गुरू प्रतिनिधी असे ।।२२।।

हाती सद्‌गुरुनी धरिता, आत्मदर्शन होतसे ।
वेगळेपण, द्वैताचा, भ्रम हा नष्ट होतसे ।।२३।।

प्रयत्ना साह्य ते होती, दक्ष सांभाळ करावया ।
प्रतिक्षणी सावधान, राखून करिती दया ।।२४।।

द्वैत बंधन जाताच, सर्व पूर्ण जगी दिसे ।
अपूर्ण जग ते आता, अवघे पूर्ण होतसे ।।२५।।

प्रेमाने जोडिले जाते, चैतन्ये सांधले असे ।
जातसे क्षुद्रता सारी, आनंद भरुनी वसे ।।२६।।

व्यक्तापुढील अव्यक्त, अद्वैत भगवंत तो ।
अनुभवा आणुनी सद्‌गुरु, मुक्तिचे कार्य साधितो ।।२७।।

विदेही, प्रेमि, नि:स्वार्थी, निरपेक्ष तसा असे ।
जीव–उद्धार हा ध्यास, भूतली ईश जो वसे ।।२८।।

गुरुतत्त्वव्यवस्था ही, सर्वांना लाभली असे ।
गाठोत सर्व पूर्णत्व, शोधुनी सद्‌गुरू तसे ।।२९।।

सर्वांना सद्‌गुरु लाभोत, तशी जीवांस मुक्तता ।
स्वानन्दे सर्व नांदोत, तीच दीनास धन्यता ।।३०।।

सद्‌गुरुकार्यतरंग नाम तिसरा अध्याय समाप्त ।

श्रीसद्‌गुरुचरणार्पणमस्तु ।

ॐ तत् सत् ।।

* ६. नव्या चिंतनिका *

● साधुलक्षण चिंतनिका ●

भगवंताचे आवडते भक्त । त्यांचे वर्णन नवव्या अध्यायात ।
लक्षणे अठरा ज्ञानेश्वरीत । वर्णिली माउलींनी ।।१।।
पहिले पहा निर्मळ मन । त्यात देवाचे निवासस्थान ।
ते दुसरे लक्षण । या महात्म्यांचे ।।२।।
तिसरे स्वत:च्या आस्थेने । धर्म जगविती निष्ठेने ।
चौथा विवेक जगणे । ज्यांच्या ओलाव्यात ।।३।।
पाचवे ज्ञानगंगेचे स्नान । सहावे पूर्णतेचे जेवण ।
जेवुनी येई तृप्तपण । अशा महात्म्यांना ।।४।।
सातवे लक्षण पालवी । ते शांतीच्या वेलीला नवी ।
त्यांच्या इंद्रियांनी लेणी घालावी । शांतीचीच जणु ।।५।।
आठवे लक्षण पूर्णता । त्यांच्या अंगी असता ।
त्यालाच अंकुरे पूर्णता । पूर्णातून पूर्णाप्रमाणे ।।६।।
नववे ते धैर्य मूर्तिमंत । दृहावे सदैव आनंदित ।
मुक्तीचीही अपेक्षा न ठेवित । ते लक्षण अकरावे ।।७।।
बारावे लक्षण नीती । जी ते प्रत्यक्ष जगती ।
चित्ताची व्यापक स्थिती । ते तेरावे लक्षण ।।८।।
चौदावा विशाल अनुभव । पंधरावे देवाचे सुदैव ।
सोळावे जगणे सदैव । सर्वत्र भगवंत जाणुनी ।।९।।
सतरावे करिती प्रेम । सर्वांवरी ते पुरुषोत्तम ।
वयापरी वाढे प्रेम । सर्वांवरचे ।।१०।।
अठरावे निखळ वैराग्य । तेच मानिते आपुले भाग्य ।
मानते उपासनायोग्य । वैराग्य त्यांना ।।११।।
ही अठरा साधुलक्षणे । मनन करुनी जगणे ।
होते आनंदाचे जिणे । भगवंतप्रसादे ।।१२।।

*

श्री ज्ञानेश्वरी : अध्याय नववा

●संक्षिप्त आदेश चिंतनिका●

देवाने पाच आदेश, दिले नवव्यात मोजके ।
अर्जुनाच्या निमित्ताने, सर्व भक्तांस कौतुके ।।१।।

पहिले नमन नित्याने, नसावे नमन समन ते ।
करणे नमन सर्वांस, देव समजून त्यांस ते ।।२।।

कर्मे तशा क्रिया सर्व, करणे देवास अर्पण ।
कसलेही ते असो कर्म, यज्ञ–वेतन–भोजन ।।३।।

तिसरा आदेश जाणावा, देव यज्ञास साधणे ।
स्मरणाने जाळणे इच्छा, पूजा कर्मांस मानणे ।।४।।

चवथे मन पालटणे, करणे देवरूप ते ।
कधी न विसरणे देवा, मर्म त्याच्यात सर्व ते ।।५।।

पाचवे करणे मनना, देह का प्राप्त जाहला ।
भक्तीने साधणे मोक्षा, मार्ग सर्वांस हा भला ।।६।।

*

* ७. नवे मराठी मंत्र *

● ईशसाधन अग्निमंत्र ●

(श्रीकृपेने लाभलेल्या या मंत्रांच्या रचनेमागील भूमिका, त्याचा साधकांना चित्तशुद्धी व साधनेतील प्रगती यांसाठी होऊ शकणारा व्यक्तिगत व सामूहिक उपयोग, यांवरील तीन निरूपणे संतछायेत झाली आहेत. तसेच, या अग्निमंत्रांसमवेत ईशावास्य सममंत्र म्हणण्याच्या, ऐकण्याच्या प्रयोगाचे प्रात्यक्षिक संतछायेतील तेविसाव्या साधनशिबिरात घेण्यात आले आहे. जिज्ञासूंनी कृपया ते पहावे, ही विनंती. अन्य मराठी मंत्र साधनपदावलीच्या पुढील भागात देण्यात येत आहेत.)

॥ ॐ ॥

हे विश्व ज्यातुनी येते, चालते, लय पावते ।
निराकारास त्या स्मरुनी, नमितो सृष्टिदेवते ॥१॥

ब्रह्माविष्णुमहेश्वरही, गणेश, कुलदेवता ।
वंदितो सद्‌गुरू, संत, ईश्वरीमार्गदेवता ॥२॥

आकाशी संचरे वायू, साह्य अग्नीस जो करी ।
प्रकाशक तशा दाहक, अग्नीला नमन मी करी ॥३॥

अग्नीतून जलप्राप्ती, जीवनाधार सृष्टिला ।
मातृरूप नमी पृथ्वी, सर्व जे लाभले मला ॥४॥

बाहेर अंतरी असशी, अग्नी हे अतिपावना ।
प्रार्थना करितो तुजला, घडवी शुद्ध साधना ॥५॥

इच्छा, खाणे, पिणे, फिरणे, कर्मे वा साधने असो ।
विकार, भय, अज्ञान, देवाआड कुणी नसो ।।६।।

आड माझ्यामध्ये ऐसे, ते जाळुनि कृपा करी ।
आता प्रकाशवी मार्गा, नेई जो थेट अंतरी ।।७।।

आनंदे सर्व प्रारब्धे, संपवण्या शक्ति दे मला ।
दाखवी देव माझ्यातिल, तसा सर्वांतरातला ।।८।।

भेद, स्वार्थ, दुर्बुद्धी, लवलेश नसो मनी ।
प्रकाश जीवनी देई, अंती ईश्वर गाठुनी ।।९।।

अग्नये नमो, अग्नये नमो, अग्नये नमः ।।

*

* ८. नवे सममंत्र *

ईशावास्य – सममंत्र

(ईशावास्य उपनिषद हे आकाराने अत्यंत छोटे पण जीवनाच्या अनेक अंगांना नेमका स्पर्श करणारे म्हणून जगप्रसिद्ध आहे. अनेकांच्या नित्यपाठातही ते आहे. त्या उपनिषदाच्या नुसत्या पठणातसुद्धा मनाला पवित्र करण्याचे सामर्थ्य आहे. फक्त अनेकदा त्याच्या अर्थामध्ये असलेल्या सामर्थ्याचा आणि त्याचा जीवनाला उपयोग करून घेण्याचा मोठा व खरा फायदा, आर्ष संस्कृत भाषेमुळे घेता येत नाही ही अनेकांची मोठी अडचण आहे. त्याचे अनुवाद करण्याचे प्रयत्नही पूर्वी अनेक थोर व्यक्तींनी केले आहेत.

तरीही सामान्य माणसाला आजच्या भाषेमध्ये आणि विशेषतः तेवढ्याच श्लोकांमध्ये सममंत्र करण्याचा हा एक श्रींच्या कृपेने झालेला प्रयत्न आहे. म्हणायला सोपे पडावे म्हणून त्याचे रूपांतर करताना श्लोकरचनेची समान पद्धत ठेवली आहे. मूळ मंत्र हे एका विशिष्ट वृत्तात नसले तरी ते द्रष्ट्या ऋषींचे असल्यामुळे ते खूपच अर्थगर्भ आहेत. त्यामुळे सममंत्र करताना भाव व अभिप्रेत विचार एवढेच समाविष्ट करण्याची भूमिका ठेवली आहे. अर्थातच यामुळे काही ठिकाणी अर्थलोपाचा दोष पत्करला आहे. निदान आजच्या आयुष्याला उपयोगी पडेल एवढा गाभा यावा हा उद्देश सांभाळताना राहणाऱ्या या त्रुटीबद्दल उदार वाचकांनी क्षमा करावी व याचा शक्य तेवढा लाभ घ्यावा ही प्रार्थना. अन्य मराठी सममंत्र साधनपदावलीच्या पुढील भागात देण्यात येत आहेत.)

ॐ पूर्ण ते, पूर्ण हे सारे, पूर्णातुन पूर्ण येतसे ।
काढता शून्य शून्यातुन, शून्य शेष जसे असे ।।

ॐ शांतिः शांतिः शांतिः ।

ईश्वरे व्यापिले सर्व, त्यागुनी मग भोग तू।
परधनाची नको आशा, न करी अपहार तू ।।१।।

आयुष्य शत इच्छावे, परी कर्मांत राहुनी ।
कर्मे न बांधती तुजला, दुजा मार्ग न याहुनी ।।२।।

फिरविती पाठ आत्म्यास, प्रकाशास तशा तया ।
जाती ते आसुरी लोकी, अंधारे वेढले जया ।।३।।

मनापलिकडे वेग, स्थिर परि गतिकारक ।
प्राप्य ना इंद्रिय–देवांना, सृष्टीला प्राणदायक ।।४।।

हालचाल करी, न करी, राही जवळ दूरही ।
बाहेर अंतरी आत्मा, दिक्कालातीत आतही ।।५।।

स्वत:त सर्व जगताला, जगती स्वत:सही ।
पाही, तो कधि न कंटाळे, कोणासही कशासही ।।६।।

जग ज्यास आपुले झाले, सर्वत्र भरुन जो असे ।
नित्य एकत्व झाल्यास, मोह शोक कुठे कसे ? ।।७।।

अशरीर शुद्ध निष्पाप, निर्मलात्मा अलिप्तही ।
मुक्त सार्थ शाश्वतता, देतो तो व्यापकत्वही ।।८।।

अज्ञानी, कर्म आचरिती, अंधारात प्रवेशती ।
ज्ञानी जे रमती तेही, अंधारीच प्रवेशती ।।९।।

अज्ञानापलिकडे प्राप्य, ज्ञानापलिकडे तसे ।
अनुभवी पुरुषांकडुनी, ऐकिले ते असे, असे ।।१०।।

अज्ञानज्ञान दोन्हींसह, आत्मज्ञानास जाणतो ।
अज्ञाने नाश टाळूनी, ज्ञानाने मुक्त होत तो ।।११।।

व्यक्तास उपासती जे ते, अंधारात प्रवेशती ।
अव्यक्ती रमती तेही, घोर तमी प्रवेशती ।।१२।।

व्यक्तापलिकडे तत्त्व, अव्यक्तापलिकडे तसे ।
विवरिले घडविले दर्शन, त्यांचे हे सांगणे असे ।।१३।।

व्यक्त अव्यक्त दोन्हींसह, आत्मतत्त्वास जाणती ।
व्यक्ताने तरुनी मृत्यू, अव्यक्ते मुक्ति पावती ।।१४।।

सोन्याने झाकले सत्य, पात्र बाजूस ते करी ।
दर्शना सत्यसूर्याच्या, कृपा ही प्रभु तू करी ।।१५।।

प्रजापति यमा सूर्या, पसरी किरण आवरी ।
कल्याणरूप तव पाही, मी आहे तेच अंतरी ।।१६।।

वायूत मिसळुनी प्राण, भस्म हो देह नश्वर ।
मना मात्र स्मरी कर्मे, अंती तो परमेश्वर ।।१७।।

जाणत्या अग्नि तू नेई, आम्हाला भोगण्या फला ।
पापबुद्धीस जाळी तू, नमस्कार असो तुला ।।१८।।

ॐ पूर्ण ते, पूर्ण हे सारे, पूर्णातुन पूर्ण येतसे ।
काढता शून्य शून्यातुन, शून्य शेष जसे असे ।।

ॐ शांतिः शांतिः शांतिः ।

*

* ९. नवे श्लोक *

१. अर्थ कळो

(उपासना पद्धतीत निर्माण होणारे दोष दूर व्हावे म्हणून हा श्लोक मधून मधून म्हणावा व चिंतनासाठी, आत्मपरीक्षणासाठी घ्यावा.)

स्तोत्रे, श्लोक, कवित्व, पाठ, पठणे, अन् आरत्या, प्रार्थना ।
मंत्रोच्चार, अभंग, पद्यरचना, ओव्या तशा अर्चना ।।
बोधाची वचने, तशी प्रवचने , चर्चा तसे बोलणे ।
त्यांचा अर्थ कळो, नसेल तरि ते अवघे वृथा कष्टणे ।।

*

२. सकाळची प्रार्थना

(सकाळच्या उपासनेसाठी उपयोगी पडू शकणारा श्लोक. हा श्लोक उपासनेच्या वेळी किंवा इतर वेळी किंवा उपासना न करणाऱ्या व्यक्तींनीदेखील सकाळच्या वेळी म्हटल्यास दिवसभराच्या कृतींवर विधायक परिणाम होण्यासाठी त्याचा उपयोग होऊ शकेल.)

ज्यांनी सकाळ घडता मज जागवीले ।
शक्तीस्मृती सकळ जे परतोनि दिधले ।।
त्या ईश्वरा स्मरुनिया कृति होउ देत ।
ही भावना दिनभरी जगु दे मनात ।।

*

३. सद्‌गुरुवंदन

(आपल्या विशिष्ट सद्‌गुरूंच्या स्मरणाचा काही वेगळा श्लोक असल्यास या जागी किंवा या श्लोकाबरोबर तो श्लोक घ्यावा.)

ज्यांच्या कृपेने मुखी नाम येते ।
शब्दे जयांच्या समाधान टिकते ।।
त्या ब्रह्मचैतन्य दयानिधीते ।
साष्टांग मी वंदि एकाग्र चित्ते ।।

*

४. शुद्ध ध्येय

(आपण जगामध्ये नेमके कशामुळे आलो, पुन्हापुन्हा जगात का यावे लागते व या जन्मात तरी या फेऱ्यांतून मुक्तता व्हावी म्हणून आपले या जन्मीचे ध्येय काय असावे याचा बोध व्हावा, स्मरण टिकावे व कृती व्हाव्या यांसाठी हा श्लोक उपयोगी होऊ शकेल.)

घेऊन चित्त जगती या देहि आलो ।
आधी जगून कितिदा नुसताच गेलो ।।
चित्तात पालट घडो वा नष्ट होवो ।
हे शुद्ध ध्येय धरुनी हा जन्म जावो ।।

*

५. शरणागती

(ज्या दिवशी आपण सकाळपासून ठरवलेले उपासनेचे, वृत्त्यंतराचे संकल्प तडीस गेले नसतील व त्याची खंत मनास वाटत असेल अशा दिवशी रात्रीच्या उपासनेच्या वेळी खालील प्रार्थना भावपूर्वक म्हटल्यास उपयोगी ठरू शकेल. जेव्हा संकल्प काही प्रमाणात तरी समाधानकारकपणे तडीला जात असतात त्यावेळी अशा तऱ्हेच्या प्रार्थनेची गरज अर्थातच असणार नाही.)

जे जे मनी ठरविले संकल्प केले ।
ते ते कधी न टिकती, यशही न आले ।।
आता मनी विनवितो करुणाकरासी ।
द्यावी गती प्रगति या शरणागतासी ।।

*

६. खरा आधार

(नेहमीच्या प्रपंचात असो किंवा परमार्थाच्या वाटचालीत असो आपल्या चाललेल्या प्रयत्नांत इतरांची साथ असली तरी तिला अनेक कारणांनी मर्यादा असतात हे लक्षात घेऊन आपल्या सर्वच जीवनाला ज्यांचा खरा आधार असतो त्यांचे कृतज्ञतेने व भावाने स्मरण करणे ही देखील एक अत्यंत उपयुक्त प्रार्थना ठरते.)

आजन्म कास धरुनी बसलो जयांची ।
कोणास ये न करुणा मज पामराची ।।
स्वार्थास तत्पर जगी जो तो तयाच्या ।
श्रीराम अन् गुरु मला आधार यांचा ।।

*

७. कृतिकौशल्य

(अनेक कर्मे करूनही आपल्याप्रमाणे कर्मांत बद्ध न होता जे लोक उलट कर्मांनंतर मुक्त होतात, त्यांच्या कर्मे करण्यात काही कौशल्य असते हे नक्की. त्याची जाणीव व्हावी, त्यांच्याबद्दल आदर असावा व त्यांच्याकडून काही शिकता यावे या कामी या श्लोकाचा उपयोग होऊ शकेल.)

ज्यांच्या कृतींत असते, कौशल्य काही ।
कर्मे करून अवघी, ते मुक्त पाही ।।
निर्लिप्त राहुन सदा, अर्पून कर्मे ।
ते जीव थोर जगि जे, जगती स्वधर्मे ।।

*

८. दृष्ट–मंत्र

(कुणा बरोबरीच्या लहानमोठ्या व्यक्तींना काही वेगळी यशे, सन्मान मिळाले किंवा त्यांच्याकडून काही असामान्य कर्तृत्व घडले की, त्याचा निर्भेळ आनंद घेत असतानाही क्वचित असूया, मत्सर अशा स्वरूपाचे नकारात्मक भाव ते पाहाणाऱ्या व्यक्तींच्या मनात येऊन त्याचा परिणाम या यशस्वी – कर्तृत्ववान व्यक्तींवर होऊ शकतो. अशा वेळी ते दुर्भाव जावेत म्हणून फुले, मोहऱ्या इ. वस्तूंनी दृष्ट काढण्यासाठी खालील मंत्र उपयोगी पडू शकेल.)

कर्तृत्व, गौरव, यशे, सन्मान आले ।
जे वेगळे, अलौकिक कुणा दृष्टीस पडले ।।
त्याकारणे जरि कुठे दुर्भाव आले ।
मंत्रे तसे प्रभुकृपे ते नष्ट झाले ।।

(हे शब्द शेवटी तीन वेळा म्हणावेत)

*

दोन स्वधर्म

(स्वधर्म जाणून कर्मे करणे हा सामान्यांचा मुक्तीचा सोपा मार्ग आहे. त्याचे शिक्षण निसर्गातून घेता येते व स्वत:चे स्वधर्मरूप कर्महीं ठरवता येते. त्यासाठी खालील दोन श्लोक चिंतनास उपयोगी पडू शकतील.)

९. सृष्टीतील स्वधर्म

होते सकाळ नियमे सृष्टीत रोज ।
तो चंद्रसूर्य नियमे करि कामकाज ।।
पाणी तहान शमवी, दे झाड छाया ।
जो तो स्वधर्म जपतो झिजवीत काया ।।

१०. मानवी स्वधर्म

मी भागताही गरजा नच दे दुज्याला ।
माझे हवेपण किती नच अंत त्याला ।।
आता तरी समजुनी शिकु दे स्वधर्म ।
त्यागात शांति वसते जाणून वर्म ।।

*

११. संचिताच्या भेटी

(आपली रोजची दिनचर्या आचरताना मन:स्थिती बिघडवणारे घटक हे अनेकदा दिवसभरात भेटणारी माणसे असतात. अशा वेळी त्यांच्याकडे पाहाण्याची खालील श्लोकात दिलेली योग्य दृष्टी आल्यास व टिकल्यास हा अडथळा दूर करणे शक्य होते.)

मी देह घेउन जगी जन्मास आलो ।
सूक्ष्मात संचित किती घेऊन आलो ।।
त्याच्यानुसार मजला जन भेटतात ।
त्यांच्यांत दु:खसुख ना मज वाटु देत ।।

*

१२. कर्मस्वातंत्र्याचे चीज

(कर्मांच्या बाबतीत माणूस प्रारब्धाने जसा काही प्रमाणात बांधला गेला आहे तसाच जीवनाला उत्तम दिशा देण्यासाठी काही प्रमाणात कर्मस्वातंत्र्याने मुक्तही ठेवला गेला आहे. याची जाणीव राहून त्याचा विधायक उपयोग करता यावा यासाठी हा श्लोक म्हणणे उपयोगी ठरते.)

देहास संचित जसे येताच असते ।
संबंध पूर्ण करिता ते नष्ट होते ।।
तैसे स्वतंत्रपण जे मज कर्म करण्या ।
तेथे विवेक मज द्या ते योग्य होण्या ।।

*

डॉ. सुहास पेठे यांच्या दर्जेदार व संग्राह्य साहित्याची सूची

(आता डिजिटल स्वरूपात)

१. **श्री ज्ञानेश्वरी : अध्याय नववा : समओवी** : श्री ज्ञानेश्वरी नवव्या अध्यायाची आजच्या सोप्या मराठीतील समओवी

२. **हरिपाठपराग :** श्री ज्ञानेश्वरांच्या हरिपाठातील काही जीवनसूत्रांचे सुबोध विवरण

३. **दर्शन :** आजच्या काळाचे अंतर्मुख करणारे दर्शन घडवणाऱ्या नव्या बोधकथा

४. **कर्तव्याची सश्रद्ध पाऊलवाट :** कर्तव्य निश्चितीसाठी सविस्तर मार्गदर्शन, शंकासमाधानासह

५. **साधनपदावली :** येथे अभ्यास,भजन व चिंतनासाठी घेतली जाणारी निवडक साधनपदे

६. **जपसंकल्प : स्वरूप व पद्धती :** जपाच्या संकल्पांसंबंधी प्रश्नोत्तररूपाने सुबोध, उपयुक्त माहिती

७. **अभंगसाधना :** श्री गोंदवलेकर महाराज यांच्या अभंगांचे साधनदृष्ट्या विवेचन

८. **जाग :** आनंदमय जीवनासाठी सोपी विचारसूत्रे

९. **जीवनजिज्ञासा** : जे. कृष्णमूर्तींच्या विचारांचा सुबोध परिचय

१०. **विचारविश्वाची ओळख :** आपल्या विचारांच्या विश्वाची सर्वांना उपयोगी ओळख

११. **चैतन्यचिंतन :**श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज यांच्या काही बोधवचनांचे सुगम विवरण

१२. **किमया** : प्रकाशमय जीवनासाठी सोपी विचारसूत्रे

१३. **प्रसादकण** : श्री तुकोबांचे नित्योपयोगी चोवीस अभंग व त्यांचे निरूपण

१४. **ठेवा** : उपनिषदांतल्या जीवनदृष्टीचे सुबोध व आगळे विवेचन

१५. **संतबोध : भाग १ :** विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

१६. **संतबोध : भाग २** : विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

१७. **संतबोध : भाग ३** : विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

१८. **वृत्त्यंतरप्रकाश** : खऱ्या परमार्थाचा श्रीगणेशा करण्यासाठी मोलाची मदत

१९. **नाम** : नामाच्या जिज्ञासूंसाठी सोपी प्रातिनिधिक प्रश्नोत्तरे

२०. **श्री विष्णुसहस्रनाम : एक जीवनशैली** : सहस्रनामांतील निवडक नामांतून उलगडणारी जीवनशैली

२१. **चिंतनक्षण : भाग १ ते १२ (एकत्रित आवृत्ती)**
चिंतनास उपयुक्त अशी एकूण ३६६ बोधवचने

२२. **उपासनेची नोंदवही :** विविध व्यक्तिगत उपासना संकल्पांची पॉकेट साईज नोंदवही

२३. **उत्तरायण - भाग १ :** जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ.पेठे यांनी दिलेली उत्तरे

२४. **शोध :** जिज्ञासू साधकांसाठी जे. कृष्णमूर्तींच्या काही विचारांचा सोपा अभ्यास

२५. **दिशा :** वास्तवावर विचार करण्याच्या काही उपयुक्त कथारूप दिशा

२६. **उत्तरायण - भाग २ :** जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ.पेठे यांनी दिलेली उत्तरे

२७. **मुलांच्या गोष्टी पण सर्वांच्यासाठी :** मुलांसाठी उद्‌बोधक व रंजक गोष्टी - मोठ्यांनाही उपयोगी पडतील अशा

२८. **बासरी :** जीवनसंगीत सुरेल करण्यासाठी काही कथामय बोध

२९. **उपासना :** खऱ्या उपासनेची गरज, स्वरूप, शंका यांचा सोपा उलगडा

३०. **श्री ज्ञानेश्वरी : अध्याय बारावा : समओवी :** श्री ज्ञानेश्वरी बाराव्या अध्यायाची आजच्या सोप्या मराठीतील समओवी

३१. **कृपापदावली भाग : १ :** भजन, चिंतन, मनन यांसाठी निवडक अभंग, पदे, नव्या आरत्या, नव्या नमनमाला, नवे नित्यपाठ, श्लोक, प्रार्थना इत्यादी

३२. **कृपापदावली भाग : २ :** भजन, चिंतन, मनन यांसाठी निवडक अभंग, पदे, नव्या आरत्या, नव्या नमनमाला, नवे नित्यपाठ, श्लोक, प्रार्थना इत्यादी

३३. **साधनपदावली भाग १ :** भजन, चिंतन, मनन यांसाठी संतांचे निवडक अभंग, पदे भूमिकांसह

३४. **सारविस्तार भाग : १ :** चिंतनक्षण वचन क्र. एक ते आठ वरील ९ निरूपणे

३५. साधनप्रेरणा : नित्योपासनेसाठी संतछायेतील संतप्रतिमा व नमनमाला यांचे डेस्कटॉप कॅलेंडररूपाने दर्शन, गुरुपदपप्रतीक व आरत्यांसह

३६. मेरी यात्रा (हिंदी) : हिंदी कविताओं में निबद्ध साधन-यात्रा

३७. बोधपाठ : आधुनिक नित्यपाठ, २७ अभंग, विवरण, विश्वात्मकाच्या आरतीसह

३८. एकाध्यायी विचारगीता : (विवरणासह) : आदर्श मानवी जीवनासाठी आचरणीय विचारांचे मोजके सार

३९. सृष्टिसंदेश : (विवरणासह) : जीवनाला विधायक दिशा देणारे २७ अभंग सृष्टीच्या आरतीसह

४०. गुरुतत्त्वतरंगिणी : गुरुतत्त्वाच्या कार्याचे तीन अध्यायांत सुबोध श्लोकबद्ध विवरण

४१. श्री ज्ञानेश्वरी : अध्याय नववा : समओवी पारायणप्रत

४२. नाम (इंग्रजी आवृत्ती) : The Simplest Path For Spiritual Liberation

४३ ते ५४. चिंतनक्षण : भाग १ ते १२ (स्वतंत्र छोटी पुस्तके) :
डॉ. पेठे यांची चिंतनास उपयुक्त अशी बोधवचने

५५. शिदोरी : व्यक्तिगत, सामाजिक व पारमार्थिक हितासाठी विचारमंथन

५६. विचारविसावा : विसावा देणारी विचारांची विद्या

५७. सारविस्तार भाग २ : चिंतनक्षण वचन क्र. नऊ ते तेरा वरील ७ निरूपणे

५८. महाराजांची शाळा : श्री गोंदवलेकर महाराज यांच्या कल्याणकारी उपदेशाचं लहान थोर सर्वांना उपयोगी ठरू शकणारं सोपं विवरण

५९. साधनपदावली भाग २ : भजन, चिंतन, मनन यांसाठी संतांचे निवडक अभंग, पदे भूमिकांसह

६०. आरतीपुष्पमाला : डॉ. सुहास पेठे रचित विविध नवीन आरत्या

६१. विनवणीची वाणी : चौदा आर्त अभंग प्रास्ताविक व निवेदनांसह

६२. श्रद्धेची पहाट : खऱ्या सुखाचा वास्तवाधार कथारूप बोध..

६३. उपासनामाला : येथे केल्या जाणाऱ्या विविध उपासना

६४. पावनपथ : श्री कृष्णदास महाराजांचा जीवन पावन करणारा उपदेशमार्ग

६५. अनुभवपुष्पे - भाग १ : चिंतनासाठी काही अनुभव-वचने

६६. कृतज्ञतामार्ग : कृतज्ञता या गरजेच्या गुणाचं सार्वत्रिक महत्त्व, जन्मभर व मृत्यूनंतर आचरणासाठी कालोचित, सोप्या, सार्वत्रिक कृती, सर्वांना स्वतंत्रपणे सहभागी होता येण्यासारखे मराठी मंत्र

६७. ज्ञानेश्वरीच्या प्रकाशात : आजच्या जीवनासाठी ज्ञानेश्वरीची सोपी ओळख

६८. श्री ज्ञानेश्वरी अध्याय नववा : समओवी : (मोठ्या आकारातील विशेष आवृत्ती) श्री ज्ञानेश्वरी नवव्या अध्यायाची आजच्या सोप्या मराठीतील समओवी

६९. संतबोध : भाग ४ : विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

७०. श्री रमणमहर्षीकृत उपदेशसार : मूळ श्लोक मराठी समश्लोकीसह

७१. उत्तरायण -भाग ३ : जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ.पेठे यांनी दिलेली उत्तरे

७२. अनुभवपुष्पे - भाग २ : चिंतनासाठी काही अनुभव-वचने

७३. श्रद्धा : श्रद्धा या विषयावरची सोपी प्रातिनिधिक प्रश्नोत्तरे

७४. अनुभवपुष्पे - भाग ३ : चिंतनासाठी काही अनुभव-वचने

७५. अर्घ्य : ज्यांचे उपकार फिटत नाहीत, त्यांच्यासाठी समजून केलेल्या प्रातिनिधिक कृती, काही कथांच्या रूपानं

७६. जीवनचिंतन : दैनंदिन आयुष्यातल्या छोट्या गोष्टींतला मोठा बोध

७७. स्वास्थ्यसंवाद : मनःस्वास्थ्यासाठी सर्वांना उपयुक्त, सोपा सुसंवाद

७८. वचनांजली भाग १ : श्री पेठेकाकांच्या प्रवचने, निरूपणे व साहित्यातील निवडक संपादित वचने

७९. अक्षरायण : आनंदप्राप्तीसाठी 'अक्षर' चिंतनसूत्रं

८०. वचनांजली भाग २ : श्री पेठेकाकांच्या प्रवचने, निरूपणे व साहित्यातील निवडक संपादित वचने

८१. भावगीता : श्रीमद्भगवद्गीतेचा मराठी समश्लोकी भावानुवाद

मजपाशी नाही काही ।
एक भाव आणिला पाही ।।